रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २०३
www.ramprahar.com

◆ सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

संघर्षाशिवाय यश प्राप्त होत नाही -आमदार डावखरे/३

कारागृहातील बंदीवानांची कुष्ठरोग तपासणी/७

शिवम सत्रेला राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत सुवर्णपदक/८

## मंकी फिव्हर आजारावर स्वदेशी लस विकसित



**नवी दिल्ली :** महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा यांसह संपूर्ण पश्चिम घाट पट्ट्यात दरवर्षी दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या 'कॅसानूर फॉरेस्ट डिसीज' अर्थात 'मंकी फिव्हर'वर भारतीय संशोधकांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. भारतीय आयुर्विज्ञान संशोधन परिषदेने या गंभीर आजारावर पूर्णतः स्वदेशी बनावटीची, सुधारित आणि अधिक प्रभावी लस विकसित केली असून, या लसीच्या मानवी वैद्यकीय चाचणीच्या पहिल्या टप्प्याला आता अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. या संशोधनामुळे विशेषतः महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील दुर्गम भागात राहणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या आजारात अचानक तीव्र ताप येणे, उलट्या, जुलाब आणि गंभीर प्रकरणांमध्ये शरीरातून रक्तस्राव होणे अशी लक्षणे दिसतात.

# राज्यात औद्योगिक क्षेत्रातील गुंडगिरी ठेचणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा स्पष्ट इशारा

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

औद्योगिक क्षेत्रात झुंडशाही-गुंडशाही खपवून घेतली जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्राची वेगाने वाढ होताना येथे काहीजण उद्योजकांना त्रास देण्याचे 'उद्योग' करत आहेत, अशी माहिती आपणाला मिळाली आहे. उद्योजकांना होणारा त्रास सहन केला जाणार नाही. अशा घटकांना ठोकून काढू, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. लगेच त्यांनी ठोकून काढू म्हणजे कायद्याने ठोकून काढू अशीही पुस्ती जोडली.



अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील सुपा (ता. पारनेर) औद्योगिक क्षेत्रातील खाजगी प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. उद्योग मंत्री उदय सामंत, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार काशिनाथ दाते, आमदार बबनराव पाचपुते, हभप नामदेवशास्त्री, हभप महंत शिवाजी महाराज या वेळी उपस्थित होते.

नागरिकांना उद्योगांकडून त्रास होत असेल तर अधिकृत यंत्रणेकडे दाद मागा, मात्र त्यांना दिलेला त्रास खपवून घेतला जाणार नाही. सुपा औद्योगिक क्षेत्रात नवे उद्योग येत असताना येथे काही वाईट 'उद्योग' तयार झाले आहेत. काहीजण उद्योजकांना त्रास देत असल्याची माहिती मिळाली आहे. 'इज ऑफ डूइंग बिजनेस', उत्पादन खर्च कमी व कायदा-सुव्यवस्था या आधारावर महाराष्ट्रात उद्योग वाढ होत आहे, मात्र अशा परिस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील एखादी छोटी घटनाही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने गांभीर्याने घेतली जाईल. जिल्हा पोलीस अधीक्षकांना मी तशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले, दावोसला गेल्यानंतर आम्ही काय करतो व आल्यानंतर काय होते हे सुपा औद्योगिक क्षेत्रातील 'तौरल इंडिया' या एक वर्षातच उत्पादन सुरू झालेल्या प्रकल्पाने विरोधकांना उत्तर दिले आहे, तेही एका मराठी उद्योजकानेच दिले आहे. 'तौरल इंडिया' या प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांनी प्रकल्पाची माहिती देताना ५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून १२०० जणांना रोजगार उपलब्ध झाल्याचे सांगितले.

पुढील पाच वर्षात औद्योगिक वीजदर वाढणार नाही याची काळजी राज्य सरकार घेणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभेत बोलताना जाहीर केले.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीचा आज निकाल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ जागा आणि १५ पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी शनिवारी (दि.७) मतदान झाले. सोमवारी (दि.९) मतमोजणी होणार आहे. मतदारांनी कुणाच्या बाजूने कौल दिला आहे हे स्पष्ट होईल. सर्व मतमोजणी केंद्रांवर मतमोजणीची तयारी पूर्ण झाली आहे. मतमोजणी केंद्रांवर कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी १७३ आणि पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी ३२९ अशा एकूण ५०२ उमेदवारांचे भवितव्य शनिवारी मतदान यंत्रांत बंद झाले. त्याचा निकाल सोमवारी लागेल. मतदान झाल्यानंतर आकडेमोड सुरू झाली. कुणाला किती मते मिळतील, कोण जिंकेल, कुणी कुणाला मदत केली याची चर्चा सुरू आहे.



### रायगडात येथे होणार मतमोजणी

पनवेल - व्ही. के. हायस्कूल पनवेल, कर्जत - तहसील कार्यालय परीसर, खालापूर - पंचायत समिती कार्यालय आवार खालापूर, सुधागड - तहसील कार्यालय (सुधागड), पेण - लिटील एंजल स्कूल पेण, उरण - प्रकल्पग्रस्त सिडको प्रशिक्षण केंद्र, अलिबाग जिल्हा क्रीडा संकुल नेहुली, मुरुड - दरबार हॉल मुरूड , रोहा - ज्येष्ठ नागरिक सभागृह रोहा, तळा - पंचायत समिती कार्यालय परीसर तळा, माणगाव - तहसील कार्यालय माणगाव, म्हसळा - न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज म्हसळा, श्रीवर्धन- मध्यवर्ती प्रशासकीय इमारत श्रीवर्धन, महाड - डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक महाड, पोलादपूर - तहसील कार्यालय, पोलादपूर.

# वरंधा घाटातून कार दरीत कोसळली

## चौघांनी उड्या मारून वाचवले प्राण

**महाड : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या मतदानासाठी मुंबईवरून महाडला गेलेल्या चार जणांनी परत येताना मृत्यूला चुकवले. महाडला मतदान करून चौघे कारने परत मुंबईला निघाले पण, वरंधा घाटात कार अनियंत्रित झाली आयुष्यभर आठवणीत राहील अशी घटना घडली. चौघांवर झडप घालायला काळ आला, पण त्यांनी काळाला चकवत कारमधून उड्या मारल्या आणि जीव वाचवला. तर कार खोल दरीत जाऊन पडली.

भोर-महाड मार्गावरील वरंधा घाटात ही घटना घडली. कार महाडवरून भोरच्या दिशेने येत होती. घाटात असलेल्या शिरगावच्या हद्दीत एका धोकादायक वळणावर चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले. कार दरीच्या दिशेने जात असतानाच आत बसलेल्यांना अंदाज आला की आपणही दरीत कोसळणार. अवघ्या काही क्षणात चौघांनीही लगेच कारचे दरवाजे उघडले आणि बाहेर उड्या मारल्या. (पान २ वर..)

# मुंबईसह देशभर तापमानात वाढ; उन्हाच्या झळा जाणवू लागल्या

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह देशातील विविध भागांमध्ये हवामानात लक्षणीय बदल होताना दिसत आहेत. जानेवारी महिन्यात उत्तर भारतात तीव्र थंडीची लाट जाणवत होती. दिल्ली, पंजाब, हरियाणा, राजस्थानसह अनेक भागांत कडाक्याची थंडी पडली होती, तर हिमालयीन परिसरात मोठ्या प्रमाणावर हिमवृष्टी झाली होती, मात्र फेब्रुवारीच्या सुरुवातीलाच या परिस्थितीत बदल झाला असून आता उन्हाळ्याची चाहूल लागली आहे.

राजधानी दिल्ली, आर्थिक राजधानी मुंबई तसेच मध्य भारतातील अनेक भागांमध्ये तापमान झपाट्याने वाढताना दिसत आहे. मुंबईत गेल्या काही दिवसांपासून उकाडा जाणवू लागला आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत उन्हाची तीव्रता वाढली असून काही भागांत उष्णतेची लाट जाणवत आहे. हवामान खात्याच्या माहितीनुसार, सांताक्रूझ वेधशाळेत कमाल तापमान ३५.१० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले, जे सरासरीपेक्षा सुमारे ४.२० अंश सेल्सिअसने अधिक आहे. फेब्रुवारी महिन्यातच इतके जास्त तापमान नोंदवले जाणे हे चिंताजनक मानले जात आहे. येत्या काही दिवसांत मुंबई आणि उपनगरांमध्ये उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील इतर भागांमध्येही तापमानात वाढ होत आहे. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात सकाळी गारवा असला तरी दुपारी कडक ऊन जाणवत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, हवामानातील हा बदल हळूहळू उन्हाळ्याकडे वाटचाल करत असल्याचे संकेत देत आहे. त्यामुळे नागरिकांना आरोग्याची विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. थंडीचा प्रभाव कमी होत चालला असून दिवसा उष्णता वाढत आहे.

## निवडक

### रशियामध्ये चार भारतीय विद्यार्थ्यांवर चाकूहल्ला

**रशिया :** येथील एका वैद्यकीय महाविद्यालयाच्या हॉस्टेलमध्ये चाकूहल्ला झाला असून, या हल्ल्यात चार भारतीय विद्यार्थ्यांसह एकूण सहा जण जखमी झाले आहेत. या हल्ल्याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार हल्लेखोर हा केवळ १५ वर्षांचा मुलगा होता. हल्लेखोर मुलगा हा नॅशनल सोशालिझम व्हाईट पॉवर या नव नाझी संघटनेचा सदस्य आहे. दरम्यान, हल्ल्यानंतर येथील भिंतीवर लाल रंगात स्वस्तिकचं चिन्हही रेखाटण्यात आलं.

### अजित पवारांच्या अस्थींचे विसर्जन; कुटुंबीय भावुक

**प्रयागराज :** माजी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या अस्थींचे रविवारी (दि.८) प्रयागराज येथील त्रिवेणी संगमात विधीपूर्वक विसर्जन करण्यात आले. अजित पवारांचे पुत्र जय पवार यांनी पारंपरिक धार्मिक विधी पाळत संगमात अस्थी विसर्जन केले. या वेळी कुटुंबीय, नातेवाईक आणि पक्ष कार्यकर्ते उपस्थित होते. पवार कुटुंबीय चार्टर्ड विमानाने बारामतीहून प्रयागराजला पोहचले. प्रयागराज संगमाच्या घाटावर अस्थी विसर्जनाचा विधी पार पडला.

# एसटीच्या नव्या बसेसचे नामकरण राजमाता जिजाऊ

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईकांनी दिली माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला आधुनिकतेची जोड देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात लवकरच नव्या दमाच्या बसेस दाखल होत आहेत. गर्दीच्या मार्गांवर प्रवाशांना उभे राहून प्रवास करावा लागू नये, यासाठी ३ बाय २ आसन रचनेच्या तब्बल ५५ आसनी अत्याधुनिक बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. या नव्या बसेसना 'हिंदवी स्वराज्याची जननी असलेल्या राजमाता जिजाऊ' यांचे नाव देण्यात आले असल्याची माहिती राज्याचे परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या बसेस मार्च महिन्यापासून टप्प्याटप्प्याने राज्यभर प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार असून, भगव्या आणि शुभ्र पांढऱ्या रंगसंगतीत सजलेल्या या बसेस महाराष्ट्राच्या परंपरेचे आणि अभिमानाचे जणू चालते-बोलते प्रतीक ठरणार आहेत.





मंत्री सरनाईक म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे दैवत आहेत. त्यांच्या स्वराज्य संकल्पनेमागे उभी राहिलेली प्रेरणाशक्ती म्हणजे राजमाता जिजाऊ साहेब! त्या अर्थाने त्या हिंदवी स्वराज्याच्या जननी ठरतात. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ एसटीच्या नवीन बसेसचे राजमाता जिजाऊ असे नामकरण केले आहे. अर्थात, एसटीने यापूर्वी शिवनेरी, शिवशाही, शिवाई, यशवंती, हिरकणी अशा नावांनी बसेसना यापूर्वी गौरवले आहे. आता त्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

### परंपरा आणि प्रगतीचा सुंदर संगम

'राजमाता जिजाऊ' हे नाव केवळ नामकरण नाही, तर स्वराज्याच्या संस्कारांचा, मातृशक्तीच्या प्रेरणेचा आणि प्रवाशांच्या सोयीसाठीच्या बांधिलकीचे एक सन्मानचिन्ह आहे. लवकरच इतिहासाच्या साक्षीने सजलेल्या या बसेस आधुनिक सुविधांसह महाराष्ट्राच्या रस्त्यांवर धावतील असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

# भारत-मलेशिया यांच्यात अनेक करारांवर स्वाक्षरी

## दोन्ही देशांना होणार आर्थिक फायदा

**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या निमंत्रणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचा दोन दिवसांचा अधिकृत दौरा सुरू केला आहे. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून पंतप्रधान मोदींचा हा तिसरा मलेशिया दौरा आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदींच्या या दौऱ्यामुळे भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाला कशी गती मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या उपस्थितीत भारत आणि मलेशियामध्ये सहा प्रमुख करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. कालालंपूरमधील द्विपक्षीय चर्चेदरम्यान, दोन्ही देशांनी सांस्कृतिक, आर्थिक आणि धोरणात्मक सहकार्य आणखी दृढ करण्यास सहमती दर्शविली.

पंतप्रधान मोदींच्या मलेशियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यात दोन्ही नेत्यांमध्ये व्यापक चर्चा झाली. परराष्ट्र मंत्रालयाच्या मते, भारत-मलेशिया व्यापक धोरणात्मक भागीदारी पुढे नेण्यासाठी ही भेट एक महत्त्वाचा टप्पा ठरती.





या चर्चेत व्यापार, गुंतवणूक, सेमीकंडक्टर्स, संरक्षण, सुरक्षा, सागरी सहकार्य, ऊर्जा, अक्षय संसाधने, पर्यटन, सांस्कृतिक देवाणघेवाण, ठिजिटत आणि नवीन तंत्रज्ञान यासह विविध क्षेत्रांचा समावेश होता. पारंपारिक आणि उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याची सामायिक इच्छा दोन्ही नेत्यांनी व्यक्त केली.

या भेटीदरम्यान अनेक द्विपक्षीय करार आणि सामंजस्य करारांची देवाणघेवाण झाली. यामध्ये सुरक्षा सहकार्य, संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमांमध्ये सहभाग, सेमीकंडक्टर विकास, आरोग्य आणि औषध, आपत्ती व्यवस्थापन आणि भ्रष्टाचारविरोधी सहकार्य यांचा समावेश आहे.

# लाखो भाविकांची शेगावात मांदियाळी

## संत गजानन महाराज प्रकट दिन सोहळा



**बुलढाणा : प्रतिनिधी**

शेगावात संत गजानन महाराजांचा १४८वा प्रकट दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या शेगावात या निमित्ताने लाखो भाविकांनी गर्दी केली होती. राज्यभरातून जवळपास ७०० पेक्षा जास्त दिंड्या आणि तीन ते चार लाख भाविक शेगावात दाखल झाले होते.

भाविकांच्या सोयीसाठी महाराजांचे मंदिर शनिवारपासून दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले होते. गेल्या दोन दिवसांपासून मंदिर परिसर २४ तास भाविकांसाठी खुला होता. सकाळी ७ वाजता प्रहारची आरती होऊन या उत्सवाला विधिवत सुरुवात झाली.

गजानन महाराजांच्या समाधी दर्शनासाठी भाविकांना साधारणतः सहा तासांचा अवधी लागले, तर मुखदर्शनासाठी एक ते दीड तास प्रतीक्षा करावी लागली. भाविकांची ही प्रचंड गर्दी महाराजांवरील श्रद्धेचे प्रतीक आहे. दरम्यान, विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

# सीकेटी महाविद्यालयात नाट्यकलेची कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालय आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नाट्यकलेतील विविध पैलूंवरील मास्टर क्लास या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेते संजय मोने यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी झाले.

(अधिक छायाचित्र पान ३ वर..)



या वेळी अभिनेते मोने यांनी भाषणात सांगितले की, अभिनय ही केवळ शिकवून येणारी गोष्ट नाही, तर ती उपजत असावी लागते, मात्र जर तुम्हाला भविष्यात समाजाचे नेतृत्व करायचे असेल, तर तुमच्या अंगी कुठल्या ना कुठल्या प्रकारचा अभिनय असणे अत्यंत गरजेचे आहे. तर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी साहित्य हा समाजजीवनाचा आरसा आहे. अभिनयाची गरज जशी कामासाठी असते, तशीच ती एक आवड म्हणूनही जोपासायला हवी. ज्याच्याकडे अभिनयाचे कौशल्य आहे, तो आयुष्यात नक्कीच यशस्वी होऊ शकतो; कारण आज प्रत्येक क्षेत्रात प्रभावी सादरीकरणासाठी अभिनयाची गरज निर्माण झाली आहे असे प्रतिपादन केले.

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही मार्गदर्शन करत, जन्मापासून ते आयुष्याच्या शेवटपर्यंत आपल्याला अभिनयाची गरज असते. एखादी गोष्ट योग्य पद्धतीने सादर करता येणे आणि ती प्रभावीपणे व्यक्त करता येणे, हे जीवनात अत्यंत महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला जनार्दन शिक्षण प्रसार संस्थेचे वाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष परेश ठाकूर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, संस्कृती विभागाच्या प्रमुख डॉक्टर गीताका तंवर, सांस्कृतिक समन्वयक गणेश जगताप, अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा पनवेलचे प्रमुख कार्यवाह शामनाथ पुंडे, अभिषेक पटवर्धन, अमोल खेर, चिन्मय समेळ, वैभव बुवा आदी उपस्थित होते. (पान २ वर..)

# समृद्धी महामार्गावर नऊ दिवसांचा ब्लॉक

**बुलढाणा : प्रतिनिधी**

राज्यातील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर ब्लॉक घेण्यात येणार आहे. तब्बल नऊ दिवसांसाठी महामार्गावरील वाहतूक बंद असणार आहे. 'हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम'अंतर्गत गॅन्ट्री उभारण्याचे काम केले जाणार आहे. त्यामुळे ९ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत २१ टप्प्यांत वाहतूक ब्लॉक घेतला जाणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील लोणार, सिंदखेडराजा व देऊळगावराजा, तसेच जालना तालुक्यात या गॅन्ट्री उभारल्या जाणार आहेत. या कामासाठी ९ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत २१ टप्प्यांत वाहतूक बंद असणार आहे. एमएसआरडीसीमार्फत गॅन्ट्री उभारण्याचे काम केले जाणार आहे. किमी ३०० ते किमी ३६५ (नागपूरपासूनचे अंतर) दरम्यान केले जाणार आहे. यात प्रत्येक टप्प्यादरम्यान वाहतूक ४५ ते ६० मिनिटांसाठी बंद असणार आहे.

ब्लॉकच्या कालावधीत महामार्गावरील संबंधित वाहिनीवरील वाहतूक पूर्णपणे थांबविली जाणार आहे. या ब्लॉकच्या कालावधीत समृद्धी महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी संभाव्य वाहतूक कोंडीपासून वाचवण्यासाठी प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन MSRDC आणि वाहतूक प्रशासनाने केले. आवश्यकतेनुसार पर्यायी मार्गांचा वापर करावा, वेळेची योग्य आखणी करा आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.

# नदी पुनरुज्जीवन, प्लास्टिकमुक्त जलस्रोत राज्याचा प्राधान्यक्रम -मंत्री पंकजा मुंडे

**मुंबई : प्रतिनिधी**

नदी पुनरुज्जीवन आणि प्लास्टिकमुक्त जलस्रोत हा राज्याचा प्राधान्यक्रम असून यासाठी जपानचे सहकार्य मोलाचे ठरेल, असा विश्वास पर्यावरण व दुग्धविकास मंत्री श्रीमती मुंडे यांनी जपानमधील सागा प्रांताचे गव्हर्नर व उच्चस्तरीय शिष्टमंडळाने भेट घेऊन पर्यावरण, प्लास्टिक मुक्ती, शिक्षण आदी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करतांना व्यक्त केला

समुद्रातील व नदीतील प्रदूषण रोखणे, प्लास्टिक कचऱ्याविरुद्ध संयुक्त प्रयत्न करणे तसेच शिक्षण, पशुसंवर्धन आणि सौंदर्यप्रसाधन उद्योग क्षेत्रात सहकार्य वाढविण्याबाबतही यावेळी महाराष्ट्र आणि जपानच्या शिष्टमंडळात सकारात्मक चर्चा झाली.



पर्यावरण व वातावरणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या 'रामटेक' या शासकीय निवास्थानी झालेल्या या बैठकीला जपानच्या सागा प्रांताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व सागा प्रांताचे गव्हर्नर योशिनोरी यामागुची यांनी केले. त्यांच्यासमवेत प्रादेशिक देवाणघेवाण विभागाचे उपमहासंचालक मसाहिरो ओनो, आंतरराष्ट्रीय धोरण गटाचे उपसंचालक कोजी योशिताके, प्रकल्प प्रमुख कोकी कनामारू आणि जेट्रो सागाचे मुख्य संचालक हिरोशी योनेयामा तर, राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंह आदी उपस्थित होते.

महाराष्ट्राला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. मात्र, समुद्रातून वाहून येणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. त्याचबरोबर नद्यांमधील प्रदूषण हीदेखील चिंतेची बाब असून, भारतीय संस्कृतीत नद्यांचे पवित्र स्थान लक्षात घेता त्यांच्या स्वच्छतेसाठी राज्य शासन विशेष कार्यक्रम हाती घेणार आहे, असे मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी राज्यपाल यामागुची यांनी जपानकडील तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापन अनुभव आणि संशोधन क्षमता महाराष्ट्रासोबत सामायिक करण्याची तयारी दर्शवली. आशियाई समुद्रातील प्लास्टिक प्रदूषण कमी करण्यासाठी ज्ञान भागीदारीच्या माध्यमातून संयुक्त उपक्रम राबविण्याबाबत दोन्ही बाजूंनी सकारात्मक भूमिकेवर यावेळी चर्चा झाली.

दुग्धव्यवसाय आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील नवकल्पना तसेच सौंदर्यप्रसाधन उद्योगातील जपानचे प्रगत तंत्रज्ञान महाराष्ट्रासाठी उपयुक्त ठरू शकते, असे शिष्टमंडळाने नमूद केले. या क्षेत्रांत औद्योगिक व शैक्षणिक सहकार्य वाढविण्याची परस्पर तयारीही व्यक्त करण्यात आली. पर्यावरण संरक्षण, शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील भारत–जपान सहकार्याला ही बैठक नवे परिमाण देणारी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला पर्यावरण मंत्री यांना जपानचे निमंत्रण

प्लास्टिक व्यवस्थापनासाठी उभारण्यात येणाऱ्या वर्ल्ड ओशन प्लास्टिक प्लॅनिंग सेंटर या केंद्राला भेट देण्याचे निमंत्रण मंत्री पंकजा मुंडे यांना दिले.

## म्हसळा तालुक्यात पुन्हा गो-हत्या वरवठणे येथे छापा; दोन आरोपी ताब्यात

**म्हसळा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात गो–हत्येवर कडक बंदी असतानाही म्हसळा तालुक्यात गो–हत्या व गोधन चोरीच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दोन दिवसांपूर्वी मजगाव (ता. तळा)येथे गोवंश हत्या रोखण्यात म्हसळा पोलिसांना यश आले होते. दरम्यान, आज पुन्हा अशाच प्रकारची धक्कादायक घटना उघडकीस आली असून म्हसळा तालुक्यातील वरवठणे येथे गो–हत्या, गोमास विक्रीची तयारी केल्याप्रकरणी पोलिसांनी धाड टाकून दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे. रविवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी पहाटे गो–हत्या होत असल्याची गोपनीय माहिती म्हसळा पोलिसांना मिळाली. त्यानुसार पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास वरवठणे परिसरात छापा टाकण्यात आला. या कारवाईत गोवंशाची हत्या करणाऱ्या दोन आरोपींना रंगेहाथ पकडण्यात पोलिसांना यश आले. तर एक आरोपी घटनास्थळावरून, पोलिसांना अडथळा करून फरार झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे मियाज महमूद तालिब (वय ४२) व मैफूस किफायत तालिब (वय २०) अशी असून तिसरा आरोपी फरार आहे. आरोपींविरोधात महाराष्ट्र गोवंश संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

## तळा तालुक्यात मतदान टक्केवारी घटली

**तळा :** तालुक्यातील मागील २०१७ च्या जि.प.व पं स निवडणुकीत ५८.२६ % तर २०२६ च्या निवडणुकीत ५१.८३% मतदान झाले आहे. या निवडणुकीत मतदानाचा टक्का घसरला असून ७ टक्क्यांनी मतदान घटले आहे. तरीही मतदारांमध्ये उत्सुकता दिसून येऊन चाकरमानी मतदारांची टक्केवारी घटल्याचे पहावयास मिळाले आहे.

या निवडणुकीत एकूण १४ उमेदवारांनी प्रत्यक्ष निवडणुक लढविली असून सर्व उमेदवारांचे लक्ष निकालाकडे लागले असून प्रत्येक उमेदवार आपल्याला कीती मते मिळतील याची बेरीज वजाबाकी करत असून मी निवडून येऊ असा अंदाज बांधत आहेत.

## खोपोलीत बाह्य रस्ते, मोकळ्या जागा आणि घाट रस्ता बनतोय दारू पिण्याचा अड्डा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोलीतील बाह्य रस्ते व मोकळ्या जागा, मुंबई–पुणे महामार्गावरील खोपोली ते सायमाळ दरम्यानचा घाट रस्ता, टाटा पॉवर कडे जाणारा रस्ता, विणानगर,शांतीनगर मागील डोंगर, चिंचवली–शेड्वली डीपी रस्ता हा परिसर वेगळ्याच कारणासाठी प्रसिद्ध बनले आहेत. अंधार पडल्यानंतर या ठिकाणी शहरातील मोठया संख्येने तरुण बिअर,दारूच्या बाटल्या घेऊन ओल्या पार्ट्या



करतांना दिसत आहेत.या सर्व ठिकाणी रिकाम्या दारू –बिअरच्या बाटल्यांचे पडलेले खच बघता हा भाग म्हणजे दारू पिण्यासाठी सुरक्षीत जागा असल्याचे स्पष्ट होत आहे .दुसरीकडे पोलीस प्रशासनानेही याकडे दुर्लक्ष केल्याने खोपोलीत हे सर्व एकदम बिनधास्त सुरू आहे.

खोपोली शहरातील सर्व वयोगटातील महिला–पुरुषांसाठी सकाळ–संध्याकाळी फेरफटका व मार्निंग–इव्हेनिंग वॉकसाठी खोपोलीतील काटरंग–मोगलवाडी–वीणानगर रस्ता,सायमाळ घाट रस्ता,टाटा पॉवर रस्ता,चिंचवली –शेड्वली बाह्य वळण रस्ता, लौजी जोड रस्ता यासह श्री गगनगिरी मठ हे प्रमुख ठिकाणे आहेत.यातील श्री.गगनगिरी मठ,मठाच्या सुरक्षा यंत्रणेमुळे पूर्ण सुरक्षीत आहे.मात्र अन्य सर्व रस्ते व मोकळ्या जागा अंधार पडल्यापासून मध्यरात्री पर्यंत जणू दारू पार्टीसाठी आरक्षीत आहेत कि, काय अशी स्थिती आहे.


घरात असलेले बंधन व बारमध्ये सार्वजनिकरीत्या बसू न शकणारे अनेक तरुण व प्रतिष्ठीत नागरिक व चोरून मद्दय पिणारया तरुणांच्या टोळ्या या ठिकाणी दारूत चिंब भिजतांना दिसत आहेत.वर्तमान स्थितीत रात्री आठ नंतर या परिसरातून सामान्य माणूस व महिलांना जाणे कठीण बनले आहे.अनेक वेळा दारू पिऊन भांडणे,तंटे सह नको तेवढा धिंगाणा घालण्याचे कामही या ठिकाणी होत आहे. दर दिवशी सकाळी या सर्व रस्ते व मोकळ्या जांगांच्या कडेला बिअर व दारूच्या रिकाम्या बाटल्यांचे खच पडलेले दिसत असून,खोपोलीतील मोठया संख्येने तरुणाई कोणत्या दिशेने वाटचाल करीत आहे

## कोर्लई किल्ल्यावर पर्यटकांसाठी अपुऱ्या सुविधा; पुरातत्व खात्याचे दुर्लक्ष

**रेवदंडा : प्रतिनिधी**

पोर्तुगिजकालीन कोर्लई किल्ला पर्यटकांसाठी खास आकर्षण ठरले आहे, मुरूड पर्यटनात पर्यटक कोर्लई पहाण्यासाठी हमखास भेट देतो, परंतू पर्यटकांना खुणावणारा कोर्लई किल्लात पर्यटकांना सुविधाच्या अभाव आढळत असून पुरातत्व खात्याचे पूर्णतः दुर्लक्ष होत आहे.

मुरूड तालुका पर्यटकांसाठी खास आकर्षण ठरले असून मिनी गोवा म्हणून संबोधले जाते, तसेच लगतच फणसाड अभयारण्य यामुळे पर्यटक मुरूड तालुका पर्यटनासाठी



भेटी देतात. तसेच साळाव या मुरूडच्या प्रवेशव्दारानजीक दोन किमी अंतरावर असलेला पोतुगिजकालीन कोर्लई किल्ला सुध्दा पर्यटकांचे खास आकर्षण आहे. तीन बाजूस समुद्र असलेल्या व चौफेर नजर ठेवण्यास उपयुक्त असा हा ऐतिहासिक पोर्तुगिज बनावटीचा किल्ला पहाण्यास नित्याने असंख्य पर्यटक येथे येत असतात.

कोर्लई किल्लात प्रारंभी जाण्यासाठी मार्ग फलकांचा अभाव असल्याने पर्यटकांना किल्लात जाण्याकडे रस्ता शोधवा लागतो.किल्लात जाण्यासाठी दोन मार्ग उपलब्ध आहेत. किल्ल्या नजीक जाताना, गाईड उपलब्ध नसल्याने किल्लात कोठून प्रवेश करावा, हा प्रश्न पर्यटकांना निर्माण होतो.एक रस्ता नादुस्त असल्याने अवघड बनला आहे, तर दुसऱ्या बाजूकडून जाताना झाडीझुडूपातून रस्ता शोधत पर्यटक व किल्लाप्रेमी मंडळीना मार्गक्रमण करावा लागतो.

## लोकसहभागातून सारसोळे जेट्टी परिसरात प्रभावी स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५–२६ अंतर्गत स्वच्छता विषयक विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात झाली असून आज रविवारच्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नवी मुंबई महानगरपालिका आणि एन्व्हायरमेंट लाइफ फाऊंडेशन, मॅनग्रुव्हज सोल्जर या संस्थांच्या व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने पाम बीच रस्त्यानजिक सारसोळे जेट्टीलगत असलेल्या खाडीकिनारी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, उपआयुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रशांत नेरकर, नेरूळ विभागाच्या सहाय्यक आयुक्त अनुराधा बाबर, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्या नियंत्रणाखाली उपमुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर, स्वच्छता अधिकारी अरुण पाटील यांनी आपले सहकारी स्वच्छता निरीक्षक विजय नाईक व नवनाथ ठोंबरे व उपस्वच्छता निरीक्षक यांच्यासह लोक सहभागातून ही मोहीम यशस्वीरीत्या राबवली.

सारसोळा जेट्टी लागत असलेल्या खाडीकिनारी उत्साहाने संपन्न झालेल्या या विशेष स्वच्छता मोहिमेत एन्व्हायरमेंट लाईफ फाउंडेशनचे अध्यक्ष धर्मेश बराई, मँग्रोज सोल्जरचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत कर्मवीर भाऊराव पाटील मॉडर्न कॉलेज वाशी, एसआयईएस कॉलेज नेरूळ, एस के कॉलेज नेरूळ, एमजीएम कॉलेज कळंबोली, सरस्वती कॉलेज खारघर, रामशेठ ठाकूर कॉलेज पनवेल, ए सी पाटील कॉलेज पनवेल, जनार्दन भगत शिक्षण संस्था कॉलेज पनवेल या प्रतिथयश महाविद्यालयांतील २०० हून अधिक एनएसएसचे विद्यार्थी व स्वच्छतादूत सक्रिय सहभागी होते. यावेळी २५० हून अधिक गोणी प्लास्टिक बॉटल, थर्माकोल असा कचरा काढून घेण्यात आला. यावेळी स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात आले

## कोपरी गावात गटाराचे पाणी नागरिकांच्या घरात; आरोग्याचा प्रश्न गंभीर



**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरी गावातील गटारांची नियमित स्वच्छता होत नसल्याने इथली गटारे कचरा आणि घाणीने भरली आहेत. त्यातच रविवारी गटातील पाण्याचा निचरा न झाल्याने संपूर्ण पाणी रस्त्यावर आणि त्यानंतर नागरिकांच्या घरात शिरले. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ही ऐरणीवर आला आहे.एकीकडे चालायला रस्ता नव्हता तर दुसरीकडे दुर्गंधीने नागरिक त्रस्त झाले होते. या बाबत नागरिकांनी महापालिकेच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

कोपरी गावातील महापालिका स्वच्छता गृहनजीकाच्या बैठ्या चाळीतील सांडपाण्याचा योग्य निचरा होत नाही. इथे वेळेवर स्वच्छता केली जात नाही. विशेष म्हणजे महानगर पालिकेच्या वतीने

### गटारांवर झाकणे लावण्याची मागणी

**आधुनिक आणि स्मार्ट सिटी असलेल्या शहरातील गावात आजही गटारे उघडी आहेत. तिथे कचरा साचलेला आहे. एकीकडे स्वच्छ शहर सुंदर शहर म्हणून महापालिका नावाजली जात असताना शहराची ही बाजू शहराची स्वच्छ शहर ही प्रतिमा मलिन करणारी आहे.**

इथल्या चाळींमधील गटारा वर झाकणे ही लावण्यात आलेली नाहीत. त्यामुळे पडणारा कचरा गटारात जाऊन अडकतो. त्यातच स्वच्छता कर्मचारी ही वर वरून सफाई करून जातात. गटारांची सखोल स्वच्छता केली जात नाही. त्यामुळे वारंवार इथे गटाराचे पाणी तुंबत असते. रविवारी त्यात शिवरेज लाइन चे पाणी ही आले. त्यामुळे हे पाणी रस्त्यावर आले . पाणी जाण्यासाठी मार्ग नसल्याने गटार चे पाणी नागरिकांच्या घरात गेले.

यामुळे सकाळी सकाळी सर्व परिसरात दुर्गंधी पसरली होती. गटाराचे पाणी घरात आल्याने अनेकाना सकाळी नाष्टा ही करता आला नाही. पाणी तुंबल्याने गटाराच्या पाण्याची दुर्गंधी सर्वत्र पसरली होती. यामुळे नागरिकांना नाक मुठीत धरून रहावे लागले. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ही ऐरणीवर आला आहे.

स्वच्छ सुन्दर शहर म्हणून नवी मुंबई शहराचा गौरव होत असताना शहरातील गावांमध्ये मात्र स्वच्छतेच्या नावाखाली केवळ दिखावा केला जात आहे. गावात अस्वच्छतेचे वातावरण सर्वत्र आहे. सांडपाणी वाहून नेणारी यंत्रणा कुचकामी झाली आहे.

पान १ वरुन

## वरंधा घाटातून कार दरीत कोसळली

चौघेही दरीच्या सुरुवातीला असलेल्या झाडीत पडले. अवघ्या काही क्षणात घेतलेल्या निर्णयामुळे चौघाचेही जीव वाचले. चौघे किरकोळ जखमी झाले, पण दैव बलवत्तर म्हणून कोणतीही प्राणहानी झाली नाही.

अपघातातील चौघेही हे मूळचे महाड तालुक्यातील रहिवाशी आहेत. ते मुंबई राहतात. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी शनिवारी मतदान पार पडले. मतदानासाठीच चौघेही मुंबईवरून कारने गावी गेले होते.

मतदान केल्यानंतर चौघेही परत मुंबईला निघाले होते. पण, वरंधा घाटात त्यांच्या कारचा भीषण अपघात झाला. धावत्या कारमधून बाहेर उडी मारल्यामुळे चौघेही किरकोळ जखमी झालेल्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## सीकेटी महाविद्यालयात नाट्यकलेची कार्यशाळा

दोन दिवस चालणाऱ्या या कार्यशाळेमध्ये संजय मोने, अभिजित झुंजारराव, प्रमोद शेलार, विशाल कदम या मान्यवरांचे मार्गदर्शन या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना लाभणार आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतील सी. के ठाकूर महाविद्यालय, सी. के. ठाकूर ज्युनिअर कॉलेज, भागुबाई चांगु ठाकूर कॉलेज ऑफ लॉ, रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स खारघरमधील विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संजय मोने यांनी अभिनयातील बारकाव्यांवर प्रकाश टाकत म्हाणले की, अभिनयासाठी वयाचे कोणतेही बंधन नसते, कोणत्याही वयात व्यक्ती स्वतःमधील कलाकार जागा करू शकते. बदलत्या काळात संवादकौशल्य आणि सादरीकरण या गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले असून, नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीला लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी अभिनयाची जोड मिळाल्यास त्याचे कार्य अधिक प्रभावी ठरते. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करत त्यांनी तरुण पिढीने कलेकडे केवळ मनोरंजन म्हणून न पाहता व्यक्तिमत्व विकासाचे साधन म्हणून पहावे, असा सल्ला दिला.

## मुलुंड येथे चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञाती मंचचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञाती मंच मुलुंड संस्थेचे उदघाटन रविवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी, सकाळी १०.३० वाजता, राजीव पोतनीस, अध्यक्ष,सी. के. पी. सभा, दादर, यांच्या हस्ते झाले

विद्याप्रबोधिनी कनिष्ठ महाविद्यालय, मुलुंड पूर्व येथे सुरुवातीला गणेश पूजन आणि दीप प्रज्वलन करून राजीव पोतनीस, अध्यक्ष, सी. के. पी. सभा, दादर, यांच्या हस्ते संस्थेचे उदघाटन झाले, नंतर जेष्ठ राष्ट्रीय जलतरणपटू श्यामला कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला, असाच उत्साह आणि ज्ञातीबंधुभागिनींचा सहकार्य मिळाला तर, हे संस्थेचे रोपटे काही वर्षांनी नक्की ज्ञातीचा वटवृक्ष होईल, आणि आपले ध्येय पूर्ण होईल, असे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुण राजीव पोतनीस यांनी सांगितले,





त्यानंतर सायबर क्राईम आणि सुरक्षितता ह्या विषयावर म्हाडा पोलीस स्टेशनचे अधिकारी माधव लाकडे आणि शैला पाटील, यांचे व्याख्यान आणि उपास्थित लोकांच्या सायबर गुन्हेगारीच्या आणि सुरक्षितता शंका समाधानचा कार्यक्रम झाला, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली गुप्ते यांनी केले

अध्यक्ष ओंकार गुप्ते, कार्यवाह योगेश देशमुख, खजिनदार, अमृता गुप्ते, कु. डॉक्टर सुरुची प्रधान, मिलिंद अधिकारी, गौरी केतकर ( गुप्ते), अनिता देशमुख, केतन गुप्ते, चंद्रशेखर देशमुख, आणि संस्थेच्या कार्यकारणी पदाधिकारी आणि सदस्यांनी कार्यक्रमाच्या हा कार्यक्रम यशस्वी करण्यास खूप परिश्रम घेतले.

### दुखवटा

## गुलाब सांगळे

**चौक :** खालापूर तालुक्यातील लोधिवली येथील सौ. गुलाब किसन सांगळे यांचे वयाच्या ८२



व्या वर्षी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. सौ. गुलाब सांगळे यांचे स्मरणार्थ ग्रामस्थांच्या वतीने वैकुंठधाम स्मशानभूमी परिसरात जांभूळ व इतर फळझाडांची लागवड करण्यात आली आहे. लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प ग्रामस्थांनी केला आहे. कै. गुलाब सांगळे या स्वभावाने अत्यंत सौम्य, शांत, मनमिळावू, कुटुंबवत्सल व सर्वांशी आपुलकीने वागणाऱ्या होत्या.

# समर्पण आणि संघर्षाशिवाय यश प्राप्त होत नाही -आमदार निरंजन डावखरे

## ◆ विसपुते विद्या संकुलात रोजगार मेळावा उत्साहात

**कळंबोली : बातमीदार**

समाजामध्ये रोजगाराच्या नवीन नवीन संधी या नेहमीच उपलब्ध होत असतात, परंतु उमेदवारांनी कोणत्याही अटी शर्ती न ठेवता रोजगार हा उपलब्ध केला पाहिजे. विसपुते विद्या संकुलामध्ये आयोजित केलेल्या मेळाव्यात तत्काळ कायमस्वरूपी नोकरी देण्याचा उपक्रम हा निश्चितच गौरवास्पद आहे. आयुष्यात कोणतीही गोष्ट सहज उपलब्ध होत नाही. यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम आणि मेहनतीची कास धरावीच लागते. समर्पण आणि संघर्षा शिवाय जीवनात यश प्राप्त होत नाही असे प्रतिपादन कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांनी पनवेल येथे केले.



आदर्श शैक्षणिक समूहाच्या पावन प्रांगणात आज भविष्याला दिशा देणारा, स्वप्नांना बळ देणारा आणि तरुणाईच्या आशांना नवे आकाश देणारा भव्य रोजगार मेळावा अत्यंत उत्साहात झाला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, पदवीधर प्रकोष्ठ - भारतीय जनता पार्टी, आदर्श शैक्षणिक समूह, नवीन पनवेल आणि युवा शक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने



आयोजित हा उपक्रम म्हणजे केवळ नोकऱ्यांचे व्यासपीठ नव्हे, तर युवकांच्या कर्तृत्वाला आकार देणारा प्रेरणास्रोत ठरला.

या कार्यक्रमास लाभलेली मान्यवरांची उपस्थिती हा सोहळ्याचा मानबिंदू ठरला. आमदार निरंजन डावखरे, कैलाश मोरे (य.च.म.मु.वि., नाशिक), डॉ. सतीश पवार (डायरेक्टर, युवा शक्ती फाउंडेशन), वामनजी नाखले (विभागीय संचालक, मुंबई विभागीय केंद्र, य.च.म.मु. वि., नाशिक), प्रशांत कांबळे, संगीता विसपुते तसेच विविध क्षेत्रांतून आलेले उद्योजक, कंपनी प्रतिनिधी, पालक व हजारो युवक-युवती यांच्या साक्षीने या मेळाव्यास खऱ्या अर्थाने सामाजिक उत्सवाचे रूप प्राप्त झाले.

या मेळाव्यासाठी ५० हून अधिक नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. दिवसभर झालेल्या मुलाखतींमधून असंख्य युवकांना रोजगाराची संधी प्राप्त झाली, तर अनेक उमेदवारांना तत्काळ ऑफर लेटर देण्यात आले हा क्षण अनेक कुटुंबांसाठी आशेचा आणि अभिमानाचा ठरला. नामांकित कंपन्यांची थेट उपस्थिती, कौशल्यविकास व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावरील मार्गदर्शनपर सत्रे यामुळे युवकांना नवी दिशा व आत्मविश्वास मिळाला.

नोकरी ही अंतिम टप्पा नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे कौशल्य, शिस्त व निष्ठा यांवरच खरे यश उभे राहते हा संदेश या व्यासपीठातून अधोरेखित झाला. महिला व दिव्यांगांसाठी समान संधी, अप्रेंटिसशिप व ऑन-जॉब ट्रेनिंग, स्टार्टअप व स्वयंरोजगार, डिजिटल साक्षरता आणि उद्योग-महाविद्यालय समन्वय यांसारख्या विषयांवर झालेल्या मंथनातून सशक्त व उद्यमशील महाराष्ट्राचे स्वप्न अधिक तेजस्वी झाले.

# फसवणुकीत दोन लाख ७० हजारांची रक्कम लंपास

**पनवेल : वार्ताहर**




व्हॉट्सअॅपवर गॅस कनेक्सन कापले जाणार असल्याचा मेसेज पाठवून सायबर गुन्हेगाराने पनवेलमध्ये राहणाऱ्या शरदचंद्र प्रधान यांच्या डेबिट व क्रेडिट कार्डमधून दोन लाख ७० हजार ७७२ रुपयांची रक्कम काढून त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर गुन्हेगाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

शरदचंद्र हे पनवेल येथे राहतात. त्यांना त्यांचे गॅस कनेक्शन रात्री कट करण्यात येणार आहे, असा व्हॉट्सअॅपवर मेसेज आला. त्यावर मी पेमेंट केल्याचा त्यांनी मेसेज केला. त्यावर समोरच्या व्यक्तीने पेमेंट अपडेट झाले नसल्याने ते अपडेट करावे लागेल, असे व्हिडीओ कॉलवर सांगितल्याने शरदचंद्र यांच्या मुलीने ते अपडेट करण्याची प्रक्रिया केली. त्यावर त्यांच्या व्हॉट्सअॅपवर महानगर गॅसची डॉट एपीके फाईल पाठवून त्यावर १२ रुपये पाठवण्यास सांगत त्यांच्या डेबिट व क्रेडिट कार्डची डिटेल मागितले.

त्यांनी क्रेडिट कार्डची डिटेल दिली, मात्र पेमेंट डिकलाईन होत असल्याचे सांगून दुसऱ्या कार्डची डिटेल्स मागितली. त्यांनी डेबिट कार्डची डिटेल्स समोरच्या व्यक्तीला दिली. त्यावर सायबर चोरट्याने शरदचंद्र प्रधान यांच्या दोन्ही एटीएम कार्डमधून दोन लाख ७० हजार ७२२ रुपयांची फसवणूक केली.

## सोन्याच्या दागिन्यासाठी शेजारणीने केली फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

१२ तोळे वजनाची सोन्याची गंठण घालण्यासाठी दिली असता ती परत न करता महिला घरातून निघून गेल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात ४ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

उज्वला गोटीराम पाटील ह्या नेवाळी येथे राहत असून त्यांच्या शेजारी शितल काथारा राहतात. २२ जानेवारी रोजी शितल यांनी त्या चिंध्रण येथे माघी गणपतीला जाणार आहे. दोन दिवसांसाठी सोन्याची गंठण घालण्यासाठी मागितली. या वेळी तिला सोन्याची गंठण दिली.

दोन दिवसांनी गंठण मागण्यासाठी शितलच्या घरी गेले असता गंठण घेऊन येते असे सांगितले. ३० जानेवारी रोजी पुन्हा काथारा यांच्या घरी गेले असता शितल घरातून काहीही न सांगता निघून गेल्याचे समजले.

## निवडक

### ५२ हजारांच्या बुटांची चोरी

**पनवेल :** अज्ञात चोरट्याने एका घराबाहेर रॅकमध्ये ठेवलेले ५२ हजार रुपये किमतीचे बूट चोरून नेल्याची घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रजापती औरनाईट को-ऑपरेटिंग हाऊसिंग सोसायटी, सेक्टर १० (राजीव गांधी मैदानासमोर नवीन पनवेल) या सोसायटीतील रहिवाशाने त्यांच्या घराबाहेर शूज रॅकमध्ये महागडे बूट ठेवले होते. ते अज्ञात चोरट्याने चोरून नेले. याप्रकरणी या रहिवाशाने दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरोधात खांदेश्वर पोलिसांनी गन्हा नोंद केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### मयताच्या नातेवाईकांचा शोध सुरू

**पनवेल :** अशरफ याचा आकस्मित मृत्यू झाल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध कामोठे पोलीस करीत आहेत. अशरफ (पूर्ण नाव माहित नाही) वय ४० वर्षे, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस काळे, दाढी वाढलेली असून अंगात पिवळ्या रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा सहा.पो.नि.प्रशांत तायडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### घरफोडीत लाखोंचा ऐवज लंपास

**पनवेल :** अज्ञात चोरट्यांनी नवीन पनवेल, सेक्टर-१२ येथील एका बंद घरात घरफोडी करून आठ लाख ११ हजारांचा ऐवज लांबवल्याची घटना घडली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रमोद कोरडे हे निवांत बंगला, सेक्टर १२, नवीन पनवेल येथे राहतात. त्यांच्या नातीचे लग्न असल्याने ते घर बंद करून चेंबूर (मुंबई) येथे लग्नाला गेले होते. चोरांनी त्यांच्या घरात प्रवेश करून सोन्याचे दागिने, घड्याळ, रोख रक्कम असा आठ लाख ११ हजारांचा ऐवज चोरून नेला. प्रमोद कोरडे हे घरी परतले असता हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आल्यावर त्यांनी याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

### जावयाने सासूला केली मारहाण

**पनवेल :** जावयाने सासूला मारहाण केल्या प्रकरणी ३ फेब्रुवारी रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील ४५ वर्षीय महिला या टेंभोडे येथे राहत असून २ फेब्रुवारी रोजी त्या नवीन पनवेल येथील गार्डनमध्ये साफसफाई करत होत्या. या वेळी त्यांचा जावई आला आणि त्याने तुमच्या मुलीला मस्ती आली आहे असे बोलून लोखंडी सळईने त्यांना मारहाण केली आणि तो पळून गेला. त्यांच्यावर प्राचीन हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

### कामोठे परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल** : कामोठे परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध कामोठे पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्षे, सडपातळ बांधा, डोक्यावरील केस काळे, दाढी वाढलेली असून, उजव्या हातावर कालीमातेचे चिन्ह, तसेच डाव्या हातावर आर.बी.सी. असे इंग्रजीमध्ये गोंदलेले आहे. तसेच अंगात मरुण रंगाचा टी-शर्ट व त्यावर निळ्या रंगाच्या नक्षीचा शर्ट घातलेला आहे व फिक्कट निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट परीधान केलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा सहा.पो.नि.प्रशांत तायडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डॉ.विजय व्यवहारे यांची नियुक्ती

**पनवेल :** असोसिएशन ऑफ क्लिनिकल् परफ्यूशनिस्ट महाराष्ट्र संस्थेची नवीन कार्यकारिणी जाहीर झाली असून यामध्ये अध्यक्षपदी डॉ.विजय व्यवहारे यांची सन २०२६ या सालाकरिता नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच कार्यकारिणीमध्ये डॉ.विजय व्यवहारे (अध्यक्ष), अभय अनंत चव्हाण (सचिव) किरण आंब्रे (खजिनदार), राजू दौड, सौ. श्रीमती कुलकर्णी (उपाध्यक्ष), सहसचिव प्रशांत धुमाळ, वैशाली मेटे, सुरेश काळे, शशी काळे, डॉ.विश्वास पॉल (सल्लागार), ई.सी.मेंबर प्रतापसिंग चौहान, विनयचंद्रा शिंपी, डॉ.विजया लांजे, लहु सुपेकर, अमित पाटील, प्राची सोनावणे, विराज शिगवाण, अक्षय रेवडेकर, पंकज पाटील, अभिषेक शेट्ये व विवेक पॉल यांची निवड करण्यात आल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# नगरसेविका बायजा बारगजेंचा पिंपळनेरच्या जन्मभूमीत सत्कार

**शिरूर : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेमध्ये आपल्या सामाजिक कार्याच्या अन् जनसंपर्काच्या जोरावर बायजा बबन बारगजे या नगरसेविका म्हणून निवडून आल्या. कळंबोलीमधील त्यांच्या फक्त हितचिंतक नातेवाईकांना जसा आनंद झाला तसाच आनंद त्यांच्या मायभूमीतील ग्रामस्थांना तेवढाच झाला. पिंपळनेरमधील ग्रामस्थांनी या दांपत्याचा एक ग्रामस्थ म्हणून यथोचित सत्कार समारंभ आयोजित केला होता.

पनवेलच्या नगरसेविका बायजा बबन बारगजे व भाजपचे उत्तर रायगड जिल्हा भटके विमुक्त आघाडीचे अध्यक्ष बबनराव बारगजे यांचा पिंपळनेर ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी शिरूर तालुका भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष सुरेश उगलमुगले यांनी गावची लेक पनवेल महानगरपालिकेची नगरसेविका झाल्याबद्दल गौरवोद्गार काढले गावाला आपला अभिमान आहे, असे सांगितले त्याचबरोबर तुमच्या ओळखीच्या फायदा गावालाही होऊ द्या असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप जायभाय गुरुजी यांनी केले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, ग्रामपंचायतचे सरपंच मिठू जायभाय, माजी सरपंच बबनराव जायभाय, माजी सरपंच अशोक बांगर, पिंपळनेर गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास बडे, आजिनाथ जायभाय, बबनराव दहिफळे, ईदूताई गोल्हार ग्रामपंचायत सदस्य व ज्येष्ठ श्रेष्ठ मंडळी उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या गावची लेक पनवेलसारख्या महानगरपालिकेमध्ये नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले व गौरवोद्गार काढले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एकनाथ जायभाय, संभाजी जायभाय, महारुद्र बारगजे, मनोज बारगजे आदी युवा कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला होता.





**पनवेल : वावंजे जिल्हा परिषदेच्या उमेदवार कमला देशेकर आणि चिंध्रण पंचायत समिती सदस्य आणि वावंजे पंचायत समिती सदस्य उमेदवार यांच्या मतदान केंद्रात भानघर, उसर्ली, चिंध्रण येथील केंद्रात पनवेल माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत व वर्षा ठाकूर यांनी भेट दिली. या वेळी नगरसेविका सीता पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# बांधकाम कामगारांसाठी पनवेल येथे 'गोदरेज सहयोग' आरोग्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोदरेज प्रॉपर्टीज लिमिटेडने (जीपीएल) 'गोदरेज सहयोग' या नवीन कामगार उपक्रमाची घोषणा केली आहे. कंपनीच्या प्रकल्पांच्या ठिकाणी काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना मदत करण्यासाठी हा एक सुनियोजित मानसिक आरोग्य आणि कल्याण कार्यक्रम आहे.

गोदरेज प्रॉपर्टीज लिमिटेडच्या मुख्य मानव संसाधन अधिकारी मेघा गोयल, गोदरेज प्रॉपर्टीज लिमिटेडचे मुख्य परिचालन अधिकारी संदीप नवलखे, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे कॉर्पोरेट ऑडिट आणि ऍश्युरन्स विभागाचे व्ही. स्वामिनाथन, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे कॉर्पोरेट सेवा विभागाचे ग्रुप हेड अजय भट्ट, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुपचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दिव्यांग दोशी आणि १ टू १ हेल्पचे मुख्य विकास अधिकारी कुणाल अशोक यांच्या उपस्थितीत गोदरेज सिटी पनवेल येथे सुरू करण्यात आलेला हा उपक्रम, सर्वसमावेशक, लोक-केंद्रित विकास आणि जबाबदार व्यावसायिक पद्धतींप्रति गोदरेज प्रॉपर्टीजच्या दीर्घकालीन वचनबद्धतेला अधोरेखित करतो.

यासंदर्भात मुंबई महानगर क्षेत्रातील सहा बांधकाम स्थळांवर सहा महिने प्रायोगिक तत्त्वावर हा कार्यक्रम राबवण्यात आला होता. यात मानसिक शिक्षणाच्या माध्यमातून २ हजारहून अधिक कामगारांना सहभागी करून घेण्यात आले होते.

# सीकेटी विद्यालयात दहावीचा निरोप समारंभ उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगु काना ठाकूर (सीकेटी)विद्यालय इंग्रजी माध्यम माध्यमिक विभाग येथे शनिवारी (दि.७) इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.





या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून नीलिमा मॅडम (मुख्याध्यापिका, इंग्रजी प्राथमिक विभाग) तसेच वैशाली पारधी मॅडम (पर्यवेक्षिका, पूर्व प्राथमिक विभाग, इंग्रजी माध्यम) उपस्थित होत्या. तसेच इयत्ता नववीचे व दहावीचे पालक प्रतिनिधी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका निर्जा अधूरी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागतगीताने करण्यात आली.

रुपेश मढवी यांनी गणेश वंदना सादर करत उपस्थित त्यांची दाद मिळवली. प्रकाश पांढरे सर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत प्रेरणादायी भाषणे सादर केली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गीत गायन सादर करून वातावरण आनंदमय केले. शशिकला मनोहर पाटील यांनी गीत सादर केले.

इयत्ता दहावीच्या पालक प्रतिनिधी जंगम मॅडम यांनी एक पालक म्हणून आपला अनुभव सांगितला आपल्या अनुभवातून त्यांनी असे म्हटले की, ही शाळा ढ विद्यार्थ्यांपासून ते हुशार विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन करते आणि आणि पालकांना नेहमी सर्व प्रकारचे सहकार्य केले जाते या पद्धतीने आपल्या भावना व्यक्त केल्या.

मुख्याध्यापक चव्हाण यांनी, मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वास या बळावर तसेच भीती न बाळगता येणाऱ्या परीक्षेला सामोरे जा असे आवाहन केले. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे आयोजन प्रकाश पांढरे सर, मंजुषा भगत मॅडम, स्वाती काळे मॅडम ह्या इयत्ता दहावीच्या वर्ग शिक्षकांनी केले होते. सूत्रसंचालनाची जबाबदारी मनीषा नारखेडे मॅडम यांनी प्रभावीपणे पार पाड ली.

आभार पूर्वा खेडेकर यांनी मानले. विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीसाठी व परीक्षेसाठी सर्व शिक्षकांनी शुभेच्छा दिल्या. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्याकडून इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.







**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालय आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नाट्यकलेतील विविध पैलूंवरील मास्टर क्लास या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रसिद्ध अभिनेते संजय मोने यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी झाले.**

## संपादकीय

# नक्षलवादावर घाव

**गडचिरोली जिल्ह्यात सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांविरुद्ध मोठी कारवाई करत सात जहाल नक्षलवाद्यांचा खात्मा केला. ठार करण्यात आलेल्या नक्षलवाद्यांमध्ये डीकेएसझेडसीचा प्रभारी प्रभाकर उर्फ रवी उर्फ स्वामी याचाही समावेश आहे. या कारवाईदरम्यान एक जवान शहीद झाला असून एक जखमी झाला आहे. नक्षल संघटनेच्या वरिष्ठ नेतृत्वावर घाव घालणारी ही कारवाई असल्याने त्याचे परिणाम दूरगामी ठरण्याची शक्यता आहे.**

कणखर नेतृत्व, सुरक्षित सीमा आणि नक्षलवादाविरोधातील निर्णायक मोहीम देशाच्या सुरक्षिततेसाठी मजबूत आणि दूरदृष्टी असलेले नेतृत्व किती महत्त्वाचे असते, हे गेल्या काही वर्षांत भारताने ठळकपणे अनुभवले आहे. देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम सीमा सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आणि त्याचवेळी अंतर्गत सुरक्षेच्या प्रश्नांकडेही तितक्याच गांभीर्याने लक्ष केंद्रित केले. याच धोरणात्मक दृष्टिकोनाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे नक्षलवादाविरोधात केंद्र सरकारने, विशेषतः केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हाती घेतलेली कठोर आणि निर्णायक मोहीम. नक्षलवाद हा केवळ कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न नसून तो देशाच्या सार्वभौमत्वाला आणि विकासाला थेट आव्हान देणारा अंतर्गत धोका आहे. अनेक दशकांपासून देशातील आदिवासी व दुर्गम भागांमध्ये ही चळवळ हिंसक मार्गाने आपले अस्तित्व टिकवून होती, मात्र केंद्र सरकारने स्पष्ट धोरण आखत नक्षलवादाला मुळासकट संपवण्याचा निर्धार केला. गृहमंत्री अमित शाह यांनी वारंवार जाहीरपणे दिलेले वेळेचे उद्दिष्ट आणि त्यासाठी राबवलेली बहुआयामी रणनीती ही या लढ्याची दिशा स्पष्ट करणारी ठरली आहे. या धोरणाचा एक ठळक परिणाम म्हणजे गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागांमध्ये झालेल्या यशस्वी कारवाया. महाराष्ट्रात सी–६० कमांडो, केंद्रीय सुरक्षा दल आणि गुप्तचर यंत्रणांमध्ये निर्माण झालेला समन्वय हा केंद्र–राज्य सहकार्याचे उत्तम उदाहरण आहे. गडचिरोलीत सात जहाल नक्षलवाद्यांचा खात्मा, त्यात वरिष्ठ नेतृत्वाचा समावेश ही केवळ एक चकमक नसून नक्षल संघटनांच्या कण्यावर बसलेला घाव आहे. या कारवाईत एका जवानाचे बलिदान झाले असले, तरी त्यांचे शौर्य नक्षलवादाविरोधातील लढ्याला अधिक बळ देणारे आहे. केंद्र सरकारने नक्षलवादाविरोधात फक्त बंदुकीवर अवलंबून न राहता सर्वसमावेशक धोरण स्वीकारले आहे. एकीकडे सुरक्षा दलांची क्षमता वाढवली जात आहे. आधुनिक तंत्रज्ञान, ड्रोन, रिअल–टाइम गुप्त माहिती यांचा वापर वाढवला जात आहे; तर दुसरीकडे रस्ते, मोबाईल नेटवर्क, बँकिंग, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांवर भर दिला जात आहे. नक्षलग्रस्त भागांचा विकास हाच नक्षलवाद संपवण्याचा खरा मार्ग असल्याची भूमिका केंद्र सरकारने ठामपणे मांडली आहे. सीमांवर शत्रूराष्ट्रांच्या कारवायांना जशास तसे उत्तर देण्याची भूमिका आणि देशांतर्गत नक्षलवादासारख्या हिंसक चळवळींना शून्य सहनशीलतेची नीती–या दोन्ही बाबी देशाच्या सुरक्षाविषयक धोरणाचा कणा ठरल्या आहेत. सुरक्षित सीमा आणि सुरक्षित अंतर्गत वातावरण याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही, ही जाणीव या धोरणामागे स्पष्टपणे दिसून येते. आज नक्षलवादाचे प्रभावक्षेत्र लक्षणीयरीत्या कमी होत आहे, ही बाब केंद्र सरकारच्या धोरणांची परिणामकारकता दर्शवते. कणखर नेतृत्व, स्पष्ट धोरण आणि विकासाची जोड मिळाल्यास नक्षलवादाचा अंधार दूर होऊन अशा भागांतही शांतता आणि प्रगतीचा प्रकाश नक्कीच पसरू शकतो.

# आंगणेवाडीच्या आई भराडी देवीची यात्रा



खबरबात
विजय मांडे

कोकणी माणूस हा उत्सवप्रेमी असून सर्व सण व उत्सव येथे मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात. कोकणी माणूस कुठेही असला तरी शिमगा (होळी), गणपती, दसरा, दिवाळी या उत्सवासाठी तो आपली हजेरी कोकणात आवर्जून लावीत असतो. या सण – उत्सवाप्रमाणेच कोकणातील, गावोगावच्या यात्रांनाही तो आपली उपस्थिती लावीत असतो. येथील आंगणे वाडी येथील आई भराडी देवीच्या यात्रेलाही कोंकणी माणूस असेल तेथून आपल्या कुटुंब कबिल्यासह मातेचे दर्शन घेण्यासाठी दोन दिवस आधीच कोंकणात येत असतात. तसेच अगदी मुख्यमंत्र्यांपासून ते साध्या ग्रामपंचायत सदस्यांपर्यंतचे राजकारणी सुध्दा आपली हजेरी लावत असतात. यंदा ही यात्रा आज ९ फेब्रुवारीला आहे. आज जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची मतमोजणी असल्याने संध्याकाळी या यात्रेला खूप गर्दी होईल.

मालवण तालुक्यापासून १५ किमीवर मसुरे गाव असून त्यातील आंगणे. आंगणे ग्रामस्थांची एक वाडी आहे. त्या ठिकाणी हे देवीचे स्थान असून ते भरडावर (माळरानावर) असल्यामुळे तसेच देवालयांचे माहेरघर असलेल्या मसुरे गावातील प्रसिद्ध देवालय म्हणजे आंगणेवाडी येथील श्री भराडी देवी. आंगणेवाडीची देवी श्री भराडी देवी ही राज्यभरातच नव्हे, तर देशभरात नवसाला पावणारी देवी म्हणून तिची ख्याती आहे. मसुरे गावची एक वाडी असलेल्या आंगणेवाडीची महती सातासमुद्रापार पोहोचली आहे. ती आई भराडी देवीमुळेच. भक्तांच्या हाकेला 'ओ ' देऊन संकटाला धावून जाणारी देवी भराडीने संपूर्ण मसुरे गाव परिसर पावन केला आहे.

या देवीबाबत अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. भरडावर देवी प्रकटली म्हणून तिला भराडी देवी असे म्हटले जाते. दुसऱ्या एका आख्यायिनुसार श्री देवी तांदळाच्या वड्यातून भरड माळावर प्रकटली असेही सांगितले जाते. ही देवी तांदळाच्या वड्यातून भरडावर प्रकटली म्हणूनच आजही आंगणे मंडळी गावात आलेल्या भाविकांना प्रसाद म्हणून तांदळाचे वडे देतात व तेथेच खायला सांगतात. भराडी देवीची जत्रा कधी सुरू झाली हे निश्चित सांगता येत नसले तरी साधारणपणे तीनशे वर्षांपूर्वी येथे पूजा – अर्चा सुरू असल्याचं सांगितलं जातं. श्रीभराडी देवीच्या महात्म्यामुळे आंगणेवाडीला हे महत्व प्राप्त झालेले आहे. पुण्याचे पेशवे श्रीमंत चिमाजी अप्पांनाही मोहिमेमध्ये भराडीदेवीचा कृपाशीर्वाद लाभल्यामुळे त्यांनी बावीस हजार एकर जमीन या मंदिराला दान दिली आहे. ही देवी स्वयंभू असून भरड भागातील एका राईत ही स्वयंभू पाषाणरूपी देवी अवतरली म्हणून तिला भराडी देवी असे म्हणतात. या देवीच्या उगमाविषयी कथा सांगण्यात येते. याशिवाय देवीच्या नवसाला पावणाऱ्या अनेक चमत्कारांविषयी बोलले जाते. त्यापैकी एक कथा पेशवाईशी जोडली गेली आहे. आंगणेवाडीतील पराक्रमी वीर पुरुष, चिमाजी अप्पांच्या सेवेत होता. अटकेपार झेंडा फडकविण्यात त्याचा सिंहाचा वाटा होता, असा इतिहास सांगितला जातो. या स्वराज्य सेवेवर प्रसन्न होऊन कुलस्वामिनी देवी तुळजाभवानी मसुरे गावातील आंगणेवाडी या छोट्याशा भरडावर प्रसन्न झाली. या वीर पुरुषाला दृष्टांत झाला. त्याची दुभती गाय पान्हा सोडत असलेल्या जागी त्याने पाळत ठेवली. तेथे जवळच राईत जाऊन पाषाणावर आपल्या पान्ह्याचा अभिषेक करताना गाय दिसली. या साक्षात्काराने प्रेरित होऊन राई मोकळी केली. गाय ज्या पाषाणावर पान्हा सोडायची, त्या जागी सजीव पाषाण सापडले. त्यानंतर पाषाणाची शुद्धता व प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

पंचवीस वर्षांपूर्वी जत्रा काही हजारांत होत होती. मात्र वर्षा गणिक भक्तांच्या संख्येत वाढ होत असून ती सुमारे दहा लाखांपर्यंत पोहोचल्याचे बोलले जाते. आंगणेवाडीत पूर्वी असलेल्या जागेवर जीर्णोद्धार करून या जागी नवीन मंदिर बांधण्यात आलेले आहे. येथे पाषाणमूर्ती असून तिची नियमितपणे पूजाअर्चा केली जाते. दररोज नवस फेडणाऱ्या भाविकांचीही इथे मोठी गर्दी असते. कोकणातील लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या आंगणेवाडी येथील श्री देवी भराडी मातेच्या वार्षिक जत्रोत्सवात महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यांतून लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी येतात. देवीच्या दर्शनासाठी भल्या पहाटेपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागतात. महाराष्ट्रातील अनेक राजकीय नेते, मराठी अभिनेते, अभिनेत्री या यात्रोत्सवासाठी आवर्जून हजेरी लावतात. भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस, होमगार्ड तैनात असतात. राज्याचे मुख्यमंत्री मंत्री मंडळातील मंत्री, विरोधी पक्षाचे नेते, मुंबई महापालिकेतील नेते या उत्सवात दर्शनासाठी हजेरी लावतात. श्रीभराडी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सरबत, आरोग्य तपासणी अशा सुविधा येथील राजकीय पक्ष देत असतात. जिल्ह्यातूनही भाविक मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवितात.

या देवीच्या मंदिरातील सर्वात मोठा उत्सव म्हणजे फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात होणारा यात्रोत्सव होय. हा यात्रोत्सव आई भराडी देवी सांगेल, त्याच दिवशी होतो. विविध देव – देवतांच्या यात्रा–जत्रा महाराष्ट्रात आणि देशात ठिकठिकाणी होतात परंतु भराडी देवीच्या यात्रेचे वैशिष्ट्य असे की, देवी सांगेल तीच जत्रेची तारीख आणि त्याच तारखेला जत्रोत्सव होतो. देव दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी डाळप ( डाळ–मांजरी ) होते. तिसऱ्या दिवशी प्रमुख आंगणे मानकरी देवळात जमतात.

देवीचा कौल घेऊन शिकारीस जाण्यात येते. ही पारध करण्यासाठी परिसरातील अनेक लोक सहभागी होतात. सात ते आठ जणांचे गट करून रान काढले जाते व डुकराचीच शिकार केली जाते. ही शिकार केल्यानंतर डुक्कर वाजत–गाजत देवळाजवळ आणला जातो. सुवासिनींकडून पारध करणाऱ्यांना ओवाळले जाते व डुकराची पूजा होते. मंदिराच्या उजव्या बाजूस 'पातोळी' असून या ठिकाणी डुक्कर कापले जाते व कोष्टी प्रसाद म्हणून दिले जाते. शिकार साधल्याच्या तिसऱ्या दिवशी पुन्हा गाव देवळात जमतो. धार्मिकविधी झाल्यानंतर देवीपुढे पंचांग ठेवले जाते व तारीख ठरवून देवीचा कौल मागितला जातो. देवीने कौल देताच जत्रेची तारिख निश्चित होते. भराडी देवीच्या यात्रेकडे केवळ कोकणच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेचे लक्ष लागलेले असते. यात्रेची तारीख निश्चित झाली की, कोकणात जाणाऱ्या गाड्यांचे म्हणजेच रेल्वे, बसचे तिकीट बुकिंग करण्यासाठी मोठी गर्दी उसळते. अवघ्या काही मिनिटांत गाड्यांचे बुकिंग केले जाते. संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे आठ – दहा लाख भाविक भराडी देवीच्या दर्शनासाठी येत असतात. यंदा ही यात्रा २२ फेब्रुवारीला आहे . पूर्वी एक दिवस असणारी ही यात्रा आता दोन दिवस असते. ट आंगणेवाडीत येणारे हे लाखो भाविक देवीच्या दर्शनाची आस घेऊन येथे येतात. वस्त्रालंकारांनी सजविलेली देवी याची देही याची डोळा पाहून जीवनाचे सार्थक झाल्याचा अनुभव भाविकांना या ठिकाणी येतो.

यात्रोत्सवाच्या दिवशी रात्री देवीला नैवेद्य दाखवला जातो. मौनव्रत स्वीकारून आंगणेवाडीतील घराघरात महिला नैवेद्य शिजवतात. भाजी, भात, वरण, वडे असा नैवेद्य तयार केला जातो आणि एकाच वेळी रांगेने मंदिरात जात दाम्पत्यांकडून तो नैवेद्य दाखविला जातो. नैवेद्य दाखवून झाल्यानंतर तो श्रद्धेने जमलेल्या असंख्य भाविकांना वाटप केला जातो. यात्रोत्सवात पूर्वी एकाच वेळी प्रसाद वाटप करणे शक्य होत नव्हते. यामुळे हा प्रसाद उडवला जात होता. त्यामुळे काहीजणांना तो मिळत नव्हता शिवाय तो पायाखालीही येत होता. त्यामुळे ग्रामस्थ मंडळाने ही पद्धत बदलली आणि नैवेद्य दाखवून झाल्यानंतर घरोघरी भाविकांना प्रसाद वाटपाची सोय केली. येणाऱ्या भाविकाला कोणत्याही घरात जाऊन प्रसाद देण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली. पाच वर्षांपासून बदललेल्या प्रसाद वाटपाच्या निर्णयाचे सर्वत्र स्वागत केले जात आहे. अशाच प्रकारे यात्रेची तारीख ठरविण्यापूर्वी केल्या जाणाऱ्या शिकारीची प्रथा बंद व्हावी, अशी अपेक्षाही भाविकांमधून व्यक्त केली जात आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल आणत आहे स्वस्त एआय फोन पिक्सेल १० ए

दोन दिवसांपूर्वी गुगलने मुंबईत आपला किफायतशीर स्मार्टफोन पिक्सल १०ए लाँच करण्याची घोषणा केली आहे. कंपनीने एका यूटच्यूब व्हिडिओमध्ये सांगितले की, नवीन एआय शक्ती असलेला फोन १८ फेब्रुवारी रोजी सादर केला जाईल.




हा पिक्सल १० मालिकेतील सर्वात स्वस्त मॉडेल असेल, जो कमी किमतीत प्रीमियम एआय वैशिष्ट्ये देण्यासाठी डिझाइन केला गेला आहे. हे लाँचिंग ॲपलच्या नवीन किफायतशीर आयफोन १७इ च्या संभाव्य घोषणेच्या काही आठवड्यांपूर्वी होत आहे, जो ॲपल मार्चमध्ये सादर करू शकतो.


कॅमेरा डिझाइनमध्ये मोठा बदल: मागील बाजूस 'बंप' दिसणार नाही गुगलने जारी केलेल्या टीझर व्हिडिओमध्ये डिझाइनची झलक मिळाली आहे. फोनचा लुक बऱ्याच अंशी जुन्या मॉडेलसारखाच आहे, परंतु सर्वात मोठा बदल त्याच्या कॅमेरा सेटअपमध्ये आहे.यावेळी गुगलने 'फ्लश' डिझाइन दिले आहे, म्हणजेच फोनच्या मागील बाजूस कॅमेरा सेटअप पूर्णपणे सपाट असेल. मागील मॉडेल पिक्सल ९ए मध्ये कॅमेऱ्याभोवती एक उंच पट्टी दिली होती.फोनच्या मागील बाजूस कॅमेरा सेटअप सपाट असेल आणि बाहेरच्या बाजूने फुगलेला दिसणार नाही.स्वस्त फोनमध्ये प्रीमियम एआय फीचर्स मिळतील

पिक्सेल ए–सीरीज गुगलसाठी खूप महत्त्वाची आहे कारण ती कमी बजेटच्या ग्राहकांना पिक्सेल इकोसिस्टमशी जोडते. पिक्सेल १०ए मध्ये गुगलच्या नवीनतम जेमिनी फीचर्सचा सपोर्ट मिळेल. गुगलचे हे एआय फीचर्स ॲपलच्या 'ॲपल इंटेलिजन्स'च्या तुलनेत अधिक प्रगत मानले जातात.

गुगलने पिक्सेल १०एच्या लॉन्चिंगसाठी फेब्रुवारी महिना निवडला आहे, कारण मार्चमध्ये ॲपल आपला स्वस्त आयफोन १७इ लॉन्च करू शकतो. तर सॅमसंग देखील आपली गॅलेक्सी एस२६ सिरीज आणणार आहे. ही सॅमसंगची फ्लॅगशिप सिरीज आहे.

गुगलला असे वाटते की, या मोठ्या ब्रँड्सच्या आगमनापूर्वी तो भारत, जपान आणि अमेरिका यांसारख्या बाजारपेठांमध्ये आपली पकड मजबूत करावी.तिथे पिक्सेल १०ए गुगलचा बाजारातील वाटा वाढवू शकतो.

# थोर समाजसेवक बाबा आमटे



निमित्त


कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहून घेणारे थोर समाजसेवक डॉ. मुरलीधर देविदास ऊर्फ बाबा आमटे यांचा आज स्मृतीदिन (९ फेब्रुवारी २००८) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...बाबांचे मूळ नाव मुरलीधर देविदास आमटे. त्यांचा जन्म २६ डिसेंबर १९१४ रोजी वर्धा जिल्ह्यातील हिंघणघाट येथे झाला. बाबांचे कुटुंब त्या भागातील जमीनदार कुटुंब होते. श्रीमंती परंपरागतरित्या चालत आलेली होती. सहाजिकच बाबांचे लहानपणही अतिशय ऐश्वर्यात गेले. बाबांकडे वयाच्या चौदाव्या वर्षी स्वतःची बंदूक होती आणि तो हरणांच्या शिकारीला जंगलात जायचे, बाबांच्या कुटुंबाची स्थिती सांगायला एवढी एक बाब पुरेशी आहे.

बाबांना लहानपणी चित्रपट फार आवडायचे. इंग्रजी चित्रपट त्यांच्या विशेष आवडीचे. अनेक नियतकालिकांसाठी ते त्या काळी चित्रपटांचे परीक्षण लिहित असत. ग्रेटा गार्बो आणि नोर्मा शेअरर यासारख्या कलावंतांशी त्यांचा पत्रव्यवहार होता. पुढे बाबांनी कुष्ठरोग्यांसाठी काम सुरू केले, तेव्हा त्यांच्या कामात पहिली मदत नोर्मा शेअरर हिचीच मिळाली होती, हे उल्लेखनीय. बाबांना लहानपणी कार चालवात यायला लागली तेव्हा एक स्वतंत्र स्पोर्ट्स कार देण्यात आली. पण बाबा लहानपणापासून स्वतंत्र विचारांचे होते. बालपण ऐश्वर्यात गेले असले तरी त्या वयातही त्यांना एक सामाजिक जाण मनात होती. त्यामुळे खेळण्यात त्यांचे अनेक मित्र खालच्या जातीचे होते. त्यांच्याशी न खेळण्यावर त्यांना बंधने घालण्यात येई. पण ती न जुमानता बाबा त्यांच्यात मिसळत असत.

कॉलेजच्या दिवसात बाबांनी अख्ख्या भारताची परिक्रमा केली. रवींद्रनाथ टागोरांच्या संगीत आणि कवितांनी प्रभावित झालेल्या बाबांनी त्यांच्या शांतीनिकेतनलाही भेट दिली. टागोरांचा बाबांवर बराच प्रभाव होता. तितकाच प्रभाव वर्ध्याजवळच सेवाग्राम येथे आश्रम असलेल्या महात्मा गांधींचाही होता. मार्क्स व माओ यांच्या विचारांनीही बाबांना आकर्षिले होते. पण त्यांच्या विचारांच्या अंमलबजावणीसाठी रशिया व चीन या दोन्ही देशातील क्रांती मात्र त्यांना आवडली नाही. साने गुरूजींचाही बाबांवर बराच प्रभाव पडला होता.

एके दिवशी त्यांनी एक कुष्ठरोगी माणूस पाहिला. हातपाय झडलेले, भर पावसात भिजत असलेला तो माणूस पाहिला आणि ते भयंकर घाबरले. पण तोच त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरला. पुन्हा परतून त्यांनी त्या माणसाची सेवा केली. पण तो जगला नाही. पुढचे सहा महिने याच उलघालीत गेलेल्या बाबांनी अखेर कुष्ठरोग्यांसाठी काम करण्याचे ठरविले आणि पत्नी साधनानेही त्यांना या निर्णयात साथ दिली. त्यानंतर मग त्यांनी आनंदवन उभारले. तेथे त्यांनी कुष्ठरोग्यांच्या रहाण्याची सोय केली. त्यांची सेवा करण्याचे व्रत आरंभले. त्यासाठी ते कुष्ठरोग्यांवरील उपचारही शिकून आले. आनंदवनात कोणतीही सोय नव्हती. त्यांनी या उजाड परिसराचे नंदवन केले. आनंदवन स्वयंपूर्ण व्हावे यासाठी तेथे शेती सुरू केली. आनंदवन हे जगभरातील लोकांसाठी कुष्ठरोग्यांसाठी एक उदाहरण ठरले.


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# उभे राहून पाणी पिणे आरोग्यासाठी घातक!

आजच्या धावपळीच्या जीवनात आपण छोट्या–छोट्या सवयींकडे दुर्लक्ष करतो. ऑफिसमध्ये, घरी किंवा बाहेर अनेकदा लोक उभ्या उभ्याच पाणी पितात. असं करून काही नुकसान होऊ शकतं, याचा काही विचारच केला जात नाही, पण आयुर्वेद आणि आरोग्याशी संबंधित मान्यतांनुसार, जितकं पाणी पिणं महत्वाचं आहे, तितकीच पाणी पिण्याची पद्धतही महत्वाची असते. उभं राहून पाणी पिण्याची सवय हळूहळू शरीराला हानी पोहचवू शकते.



आपण शांतपणे बसून पाणी पितो तेव्हा शरीराला ते हळूहळू शोषून घेण्यास वेळ मिळतो, पण उभं राहून पाणी प्यायल्यास ते वेगाने खाली जाते आणि शरीर त्याचा योग्य वापर करू शकत नाही. याचा परिणाम हळूहळू आरोग्यावर दिसू लागतो.

आयुर्वेदानुसार उभं राहून पाणी प्यायल्याने शरीरातील पाण्याचा समतोल बिघडू शकतो. पाणी योग्य ठिकाणी वापरले जाण्याऐवजी सांधे आणि गुडघ्यांच्या आजूबाजूला साचू लागते. त्यामुळे कमी वयातच गुडघेदुखी, जडपणा आणि सांध्यांचे त्रास सुरू होऊ शकतात.

बसून पाणी प्यायल्यास शरीर ते गाळून पुढे पाठवते. पण उभं राहून पाणी प्यायल्याने ते थेट किडनीपर्यंत पोहोचतं, ज्यामुळे किडनीवर जास्त ताण येतो. दीर्घकाळ अशी सवय राहिल्यास किडनीसंबंधी समस्या उद्भवू शकतात.

उभं राहून पाणी प्यायल्याने पाणी पोटात वेगाने पडतं आणि पचनक्रिया बिघडते. यामुळे गॅस, ॲसिडिटी, पोटात जळजळ, बद्धकोष्ठता आणि जडपणासारख्या तक्रारी वाढू शकतात. शरीर पाण्याचा योग्य वापर करू शकत नसेल, तर त्याचा परिणाम ऊर्जा आणि ताकदीवरही होतो. थोडेसे काम केले तरी थकवा जाणवतो आणि शरीर सुस्त वाटू लागते.

अशा प्रकारे उभे राहून पाणी पिणे आरोग्यासाठी घातक आहे. जर तुम्हाला निरोगी राहायचे असेल, तर पाणी पिताना काही गोष्टी लक्षात ठेवा. नेहमी आरामात बसून पाणी प्या, घोट–घोट करून प्या, घाई करू नका, खूप थंड पाणी टाळा, सामान्य तापमानाचे पाणी अधिक योग्य असते आणि काच किंवा मातीच्या भांड्यात ठेवलेले पाणी पिणे फायदेशीर ठरत

# चिंभावे धनगरवाडीचा मतदानावर बहिष्कार

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड तालुक्यापासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर चिंभावे ग्रुप ग्रामपंचायतच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या चिंभावे धनगरवाडी येथील मतदार यादी मध्ये ५६ मतदार असलेल्या सर्व मतदारांनी आपल्या मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यानंतरच आम्ही मतदानाचा हक्क बजावू तोपर्यंत आमचा मतदानासाठी बहिष्कार असेल अशी भूमिका घेतल्याने जिल्हा परिषद पंचायत समितीच्या झालेल्या निवडणुकीमध्ये एकही तेथील मतदारांनी मतदान केलेले नसल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.



चिंभावे एसटी स्टँडपासून धनगरवाडी गाव साधारण सहा ते सात किलोमीटर अंतराचे आहे. डोंगरमाथ्यावर वसलेल्या या दुर्गम गावात जाण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून कोणताही पक्का रस्ता नसल्याने ग्रामस्थांचे हाल झाले आहेत. वारंवार यासाठी पाठपुरावा केलेली असताना देखील आजपर्यंत ही जाणवणारी रस्त्याची मूलभूत गरज न सुटलेमुळे आम्ही मतदानावर बहिष्कार टाकला असल्याचे नमूद केले.

येथील नागरिकांसह, शाळकरी विद्यार्थ्यांना दररोज पाच ते सात किलोमीटरची पायपीट डोंगर उतारुन करावी लागत असून, मोलमजुरीवर उदरनिर्वाह करणाऱ्या ग्रामस्थांनाही दळणवळणाचा मोठा प्रश्न भेडसावत आहे. आजारी रुग्णाला दवाखान्यात न्यावे लागले तर डोलीच्या सहाय्याने चढ-उतार करावा लागतो, अशी विदारक परिस्थिती नागरिकांनी कथन केली.

निवडणूक आली की नेते गावात येतात, विकासाची भाषा करतात, पण निवडणूक संपली की परिस्थिती जैसे थे च राहते, असे ग्रामस्थांनी महाड तहसीलदार महेश शितोळे यांना निवडणुकीच्या आदल्या दिवशी दिलेल्या लेखी पत्राच्या निवेदनात म्हटले आहे.

शनिवारी झालेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीच्या दरम्यान उमेदवारांनी घरी भेटी दिल्या असता आम्ही त्यांना स्पष्ट आमचा रस्ता झाल्याशिवाय आम्ही निवडणुकीचा हक्क बजावणार नसल्याचे सांगितले. आधी रस्ता करा मगच आम्ही मतदान करू अशी आम्ही स्पष्ट भूमिका घेतली असल्याचे नागरिकांनी सांगितले.

**आम्ही मागणी केलेल्या आमच्या मूलभूत गरजा मधील मुख्य रस्ता पूर्ण होत नाही तोपर्यंत येणाऱ्या पुढील सर्व निवडणुकींवर आमचा बहिष्कार राहील.**

**– मंगेश गोरे, ग्रामस्थ**

**'आमच्या गावात एकूण ५६ मतदार असून, आजपर्यंत ते मतदान करत आले आहेत. तरीही आमच्या मूलभूत प्रश्नाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने आम्ही सर्व ग्रामस्थांनी निवडणूकीवर बहिष्काराचा इशारा टाकला आहे.**

**–नामदेव ढेबे, मतदार**

# वढाव बुद्रुक येथे युवकाची आत्महत्या

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वढाव बुद्रुक परिसरात एक दुर्दैवी व मन हेलावून टाकणारी घटना उघडकीस आली आहे. काही दिवसांपासून घरातून बेपत्ता असलेल्या तरुणाचा मृतदेह स्मशानभूमीच्या जवळ झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोक व खळबळ पसरली आहे.

मृत तरुणाचे नाव बुद्धेश कमलाकर नाईक (वय २०) असून तो फणसापूर आदिवासी वाडी, पो. बापळे, ता. अलिबाग येथील रहिवासी आहे. सध्या तो बामणगाव येथील वीटभट्टीवर वास्तव्यास होता.

३ फेब्रुवारी २०२६ पासून तो बेपत्ता होता. त्यानुसार रेवदंडा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली होती. त्यानंतर पोलीस व नातेवाईकांकडून बामणगाव व लगतच्या जंगल परिसरात शोधकार्य सुरू होते.

दरम्यान, शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.३५ वाजता, मौजे वढाव बुद्रुक, पो. बामणगाव, ता. अलिबाग येथील स्मशानभूमीच्या परिसरात असलेल्या रांजणीच्या झाडाला, कमरेच्या कापडी पट्ट्याच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत बुद्धेशचा मृतदेह आढळून आला.

पोलीसांकडून करण्यात आलेल्या प्राथमिक तपासात, संबंधित तरुणास मानसिक स्वरूपाचा आजार असल्याचे समोर आले असून, त्याच पार्श्वभूमीवर आत्महत्येचा निर्णय घेतल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



**रोहा : तालुक्यातील मुठवली गावचे सुपुत्र सौरव पिंपळकर यांनी विवाह मुहूर्ताच्या अगोदर निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला त्यावेळी उपस्थित निवडणूक अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.** (छाया : जितेंद्र जाधव)

# माथेरानच्या रस्त्यावर पुन्हा सिमेंट ब्लॉक

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमध्ये संनियंत्रण समितीने सिमेंट ब्लॉकसाठी मनाईकेली होती. त्यामुळे नगरपालिका प्रशासनची कारवाइ होणार का याकडे स्थानिकांचे लक्ष लागले आहे



माथेरानमध्ये एका खासगी मालमत्ता धारकाने आपल्या बंगल्याकडे जाणाऱ्या नगरपालिकेच्या रस्त्यावर कोणतीही परवानगी न घेता सिमेंट ब्लॉक वापरून रस्ता बनवला असल्याचे उघड झाले आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात सिमेंट ब्लॉक माथेरानमध्ये आलेले असताना त्याची कोणतीही चौकशी न होता इथपर्यंत आलेच कसे व हा रस्ता होताना नगरपालिका कर्मचाऱ्यांना याबाबत काही ही भनक लागली नाही. त्यामुळे सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे,

या ठिकाणी मोठ्या प्रमाणात माल येऊन पडला असून बांधकामाला पूर्व परवानगी असल्याशिवाय माथेरानमध्ये बांधकाम करता येत नाही. परंतु येथे मोठ्या प्रमाणात रेती सिमेंट दगड व सिमेंट ब्लॉक येऊन पडले असून माथेरान प्रवेशद्वारावर बांधकामाचे साहित्य गावामध्ये पाठवायचे असेल तर त्यास शासन मान्यता असेल तरच पाठवता येते व हे तपासण्या करीता एक कर्मचारी सदैव तैनात असतो.

परंतु या ठिकाणी हे बांधकाम साहित्य कोणाच्या सांगण्यावरून पाठविण्यात आले याची चौकशी होणे गरजेचे आहे. माथेरानमध्ये पर्यावरणवादी संघटनांनी सिमेंटचे रस्ते माथेरान करता घातक असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर येथे सिमेंट ब्लॉक वापरण्यास पूर्णतः बंदी घालण्यात आली होती, परंतु या ठिकाणी न्यायालयाचे आदेश धुडकावून लावत मोठ्या प्रमाणात सिमेंट ब्लॉक लावून रस्ता बनविण्यात आला आहे. व हे काम जवळजवळ पंधरा दिवस सुरू होते, पण या ठिकाणी एकही कर्मचारी फिरकला नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

याबाबत माथेरानचे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी चर्चा केल्यानंतर संपूर्ण माहिती घेऊन यावर निर्णय घेतला जाईल, अशी प्रतिक्रिया दिली आहे.

# रोह्यात संत गजानन महाराज प्रकट दिन मोठ्या उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

रोहे येथे श्री. ज्ञानदेव हिरामण चौधरी व सौ. भारती ज्ञानदेव चौधरी यांच्या निवासस्थानी संत गजानन महाराज शेगांव यांच्या १४८ वा प्रकट दिन सोहोळा आध्यात्मिक व मोठ्या धार्मिक पद्धतीने आणि विविध स्तुत्य उपक्रमाने पार पार पडला. हा प्रगटदिन सोहोळा गेली ३४ वर्षे नित्यनियमाने येथे साजरा केला जातो.



८ फेब्रुवारी रोजी पहाटे ५. ३०वाजता काकड आरती सकाळी ७ वाजता श्रींच्या पांदुकांची षोडशोपचार पूजा (अभंग सेवा मंडळ, रोहा) सकाळी ९ वाजता विविध स्तोत्रे पठण व श्री. गणपतीची आवर्तने. सकाळी १०. ३०ते १२वा. पालखी मिरवणूक श्री. गजानन निवास श्री. दत्तमंदिर, पंचायत समिती कार्यालय रोहा जवळून श्रीकृष्ण चौक, अंधार आळी, कल्पक सोसायटी आई (राजेंद्र मोरे निवास )ते परत गजानन कृपा निवसा पर्यंत गण गण गणांत बोते या घोषात पालखी आणली जाते. दुपारी १२-३०वा. आरती मंत्रपुष्प दुपारी १ते ३वाजता मिष्ठान्न महाप्रसाद नंतर हरिपाठ श्री. गजानन विजय ग्रंथ अध्याय १ वाचन ५ वाजता प्रवचन सेवा मनिषाताई राजेंद्र आठवले, (रोहा ) विषय (गजानन नास्मरण व शिकवण )सायं. ६ वाजता गीतगायन अभंग सेवा मंडळ, रोहा श्री. हेमंत ओक आणि त्यांचे सहकारी श्री. उदय ओक, श्री. आदित्य ओक, प्रकाश कुंटे, दिपक व संदीप बापट बंधू, मंगेश जोशी विनायक ठाकूर आदी. सतत ७ दिवस पारायण सौ. स्मिता करंबे, रंजना पांगळे ज्योस्ना भोळे, प्रतिभा पाटील, निशा सावदेकर, भारंबे व वाघूळदे अन्य भगिनींनी भाग घेतला होता. सायंकाळी ७-३०वा. तीर्थप्रसादीचा कार्यक्रम. सकाळपासून दिवसभर श्री. गजानन महाराज यांची गोड भक्तिमय गाणी रंगी-बेरंगी फुलांच्या माळा, आकर्षक रांगोळ्या व विद्युत रोषणाई परिसर सुशोभीत केला होता.

# मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

माजी आमदार स्व.तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, कर्जत, दादर - मुंबईतील ज्योविस आयुर्वेद आणि नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने स्व. दौलत गजानन देशमुख यांच्या सहाव्या स्मृती दिना निमित्त मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर व मोफत औषधे वाटप शिबिराचे आयोजन केले होते. या चिकित्सा शिबिरात २५९ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हे प्रतिष्ठानने आयोजित केलेले ३७ वे आरोग्य शिबिर होते.



या शिबिराचे उद्घाटन आयडिबीआय बँकेचे शाखा व्यवस्थापक प्रथमेश शिगवण यांच्या हस्ते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आले. याप्रसंगी ज्योविस आयुर्वेदाचे डॉ. राज सातपुते, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, परशुराम घारे, डॉ. ज्योती सातपुते, मनीषा सुर्वे, स्वाती देशमुख, अशोक देशमुख, अरविंद देशमुख, अमोल देशमुख, कोमल देशमुख, ज्योती पाटील, वेदिका देशमुख आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुकेश सुर्वे यांनी, 'आम्ही कर्जत तालुक्यासह अन्य ठिकाणी मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरे आयोजित करून 'आरोग्य आपल्या दारी' ही संकल्पना घेऊन काम करीत आहोत. तसेच आयुर्वेदाचा खेडोपाडी प्रसार व प्रचार करण्याचा आम्ही संकल्प केला आहे. हे सदोतीसावे शिबिर असून आत्तापर्यंत सुमारे पंधरा हजाराच्या वर रुग्णांना याचा लाभ मिळाला आहे. यासाठी सर्वांचे सहकार्य मिळत आहे.' असे स्पष्ट केले. डॉ. राज सातपुते यांनी, 'कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागाबरोबरच शहरातही आयुर्वेदिक चिकित्सा शिबिरांना प्रतिसाद मिळत असून आयुर्वेदाची खरी ओळख होत आहे. आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प केला आहे आणि तो प्रत्यक्षात उतरत असताना मनस्वी आनंद होत आहे.' असे स्पष्ट केले. या शिबिरात डॉ. राज सातपुते यांच्यासह डॉ. ज्ञादीपा ढवळे, डॉ. पूजा गुप्ता, आयेशा वाडकर, श्रेयश सदावर्ते, श्रावणी बारटक्के, मिकी सिंग, निधी यादव, प्रतिमा गुप्ता, एकता जाखर, भूमिका परदेशी, सौरभ कुशवाह, निकिता सानप, कोमल जाधव, अदिती गायकवाड, यश भाटी, हर्षदा जाधव, लंकेश्वरी सोलंकी, सायली परडले, रोहित कुमठेकर, प्रीती गांधी, रिशिता ओझा, दिव्या माळवणकर, कल्पना भानुशाली आदींनी आरोग्य सेवा दिली.

या शिबिरात चामखीळ आणि भोवरी तत्काळ काढण्यात आली तर पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराच्या रुग्णांची चिकित्सा करून त्यांच्यावर उपचार सुरु केले. बहिरेपणा, सांधे दुखी, कंबर दुखी, गुढघे दुखी आदी व्याधींवर उपचार करण्यात आले. २५९ रुग्णांची तपासणी आणि चिकित्सा करण्यात आली. या सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटना यांच्या माध्यमातून सर्व औषधे मोफत देण्यात आली.

# आचार्य अभियांत्रिकी महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आचार्य इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीअरिंग आणि टेक्नॉलॉजी जे.जे.महानगर रक्त केंद्र भायखळा व माया रक्तकेंद्र बदलापुर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत - खालापूर तालुक्यात आयोजित केलेले हे ५३४ वे रक्तदान शिबिर ठरले.



रक्तदानाचा उपयोग हा थेलेसेमिया नावाचा दुर्धर आजारी लहान मुला- मुलींना होणार आहे. या आजाराच्या रुग्णांमध्ये जन्मतःच शरिरात रक्त तयार होत नाही म्हणुन अश्या रुग्णांना दर १५ दिवसांनी रक्त द्यावे लागते. त्यामुळे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. या रक्तदान शिबिराचे उदघाटन आचार्य इन्स्टिटयूट ऑफ इंजिनीअरिंग आणि टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रथमेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, मयुर जाधव, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी समीर देवळेकर, विशाल यादव, विनोद पांडे आदी उपस्थित होते.

या वेळी रक्त संकलनाचे काम भायखळा येथील सर जे.जे.महानगर रक्तपेढीचे डॉ. सचिन चौधरी ,अजय भिसे ,पूजा खरडीकर,प्रविण भलगमिया,मानसी मोडकर, बिपीन लाड व प्रविण दोंदे यांनी केले.

# रोहा तालुक्यात शांततेत ६८.१६ टक्के मतदान

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी शनिवारी निवडणूक पार पडली असून निवडणूक निर्णय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवल यांच्या मार्गदर्शनाखाली १९४ केंद्रावर शांततेत मतदान झाला आहे. रोहा, नागोठणे व कोलाड पोलिसांचा ही चोख बंदोबस्त मतदानाच्या केंद्रावर दिसून आला .



जिल्हापरीषद गटच्या ४ जागेसाठी १४ उमेदवाराचे तर पंचायत समिती गणाच्या ८ जागेसाठी २५ उमेदवार भवितव्य मतपेटीत बंदिस्त झाले आहे. ९ फेब्रुवारी रोजी कोणाला लॉटरी लागेल हे मतमोजणी अंति कळून येणार आहे. रोहा तालुक्यात शनिवारी पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी ६८.१६ टक्के मतदान झाले आहे.

रोहा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी मतदार स्त्री ६४९४६, पुरुष ६३८१७ असे एकुण १२८७६३ एवढी मतदार आहेत. शनिवारी झालेल्या मतदानामध्ये स्त्री ४५४६७, पुरुष ४२३०१ एकुण ८७७६८ लोकांनी मतदान केले असून एकूण रोहा तालुक्यात ६८.१६ टक्के मतदान झाले आहे.

शनीवारी सकाळ पासून मतदानास शांततेत सुरूवात झाली असून मतदानाला सुरुवात झाल्यानंतर निवडणुकीला उभे असलेल्या साऱ्याच पक्षाचे उमेदवार सगळ्या बुथवर फिरत होते.सायंकाळी खासदार सुनील तटकरे, महीला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी दुरटोली येथे मतदान केले आहे.

रोहा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी सकाळी पहील्या सत्रात धिम्या गतीने मतदान झाले असुन १०.९ टक्के मतदान सकाळी ७.३० ते ९.३० वाजे झाले होते. त्यानंतर ११.३० पर्यंत २६.७७ टक्के मतदान झाले असुन एकूण ३४४७६ लोकांनी मतदानाचा हक्क बजावला होते. दुपारी दिड पर्यंत ४३.०६ टक्के मतदान झाले असुन ५५४४३ मतदाराने मतदानाचा हक्क बजावला.

रोहा तालुक्यात ४ जिल्हा परिषद व ८ पंचायत समिती साठी दुपारी ३.३० पर्यंत ५५.८३ टक्के मतदान झाले असुन ७१८८३ नागरिकांनी मतदान केले होते. शनिवारी दिवसभरात झालेल्या मतदानामध्ये स्त्री ४५४६७, पुरुष ४२३०१ एकुण ८७७६८ लोकांनी मतदान केले असून एकूण रोहा तालुक्यात ६८.१६ टक्के मतदान झाले आहे.

# अलिबाग कारागृहातील १७९ बंदीवानांची केली कुष्ठरोग तपासणी

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कुष्ठ मुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) शोध मोहिम अभियान २०२५-२६ अंतर्गत अलिबाग जिल्हा कारागृहात बंद्यांकरीता विशेष आरोग्य तपासणी व जनजागृती शिबीर कार्यक्रमात कारागृहातील एकूण १७९ बंदीवानांची कुष्ठरोग तपासणी करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा कारागृह अधीक्षक विशाल बाळासाहेब बांदल यांनी दिली आहे.

महाराष्ट्रात २०२७ मध्ये शुन्य कुष्ठरोग प्रसारध्येय साध्य करण्यासाठी कुष्ठरोग मुक्त सुरक्षा महाराष्ट्र (कुसुम) शोध मोहिम कार्यक्रम ३० जानेवारी २०२५ ते १३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान अलिबाग तालुक्यात राबविण्यात येतआहे. सहाय्यक संचालक, आरोग्यसेवा (कुष्ठरोग) रायगड-अलिबाग यांच्या मार्फत अलिबाग जिल्हा कारागृहात शिबीर आयोजित करण्यात आले असून डॉ. सचिन सकपाळ (वैद्यकीय अधिकारी) यांनी बंदीबांधवांना कुष्ठरोगाची लक्षणे, उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली तसेच कुष्ठ रुग्णांचा शोध, निदान आणि मोफत उपचार यावर भर देण्याच्या अनुषंगाने कारागृहात दाखल १७९ बंद्यांची कुष्ठरोग बाबतची तपासणी करण्यातआली.

या कार्यक्रमाकरीता सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग,रायगड-अलिबाग यांच्या कार्यालयामार्फत डॉ.सचिन सकपाळ कुष्ठरोग तज्ञ, भगवान जाधव तेजस मोरेराजकुमार गाजुलवार , प्रतिक पाटिल, ऋतिक जाधव , श्रीम.सोनाली जाधव, डॉ.मिलिंद पाटील उपस्थित होते.

# नवी मुंबईत हवा प्रदूषण रोखण्याला प्राधान्य





**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील हवा गुणवत्ता सुधारणेसाठी सातत्याने विविध उपाययोजना करण्यात येत असून विशेषत्वाने सायन पनवेल महामार्गावर नियमितपणे डिप क्लिनींग ड्राईव्ह राबविण्यात येत आहे.

आज तुर्भे विभाग कार्यालय क्षेत्रांतर्गत सायन पनवेल महामार्ग तसेच सानपाडा तुर्भे दत्तमंदिर परिसर येथे सखोल स्वच्छता मोहीम राबवून वायू प्रदूषण टाळण्याच्या दृष्टीने धूळ, माती सफाई करून उचलून नेण्यात आली. नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अति आयुक्त सुनील पवार, उपायुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे, तुर्भे विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे यांच्यासह, स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

### विविध सखोल स्वच्छता मोहीमा

त्यासोबतच विविध ठिकाणच्या स्वच्छता मोहीमांमध्ये लोकसहभागावर भर दिला जात असून नमुंमपा कोपरखैरणे विभाग कार्यालयामार्फत इस्कॉन एलिव्हेटर्स प्रा. लिमी. यांच्या सहभागातून संयुक्तपणे इलेक्ट्रिक झोन एम. आय. डी. सी महापे येथे दुपारच्या कालावधीत सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये इस्कॉन कंपनीचे संचालक शामी कुनेल, उपाध्यक्ष लता नाम्बीयार व महादेव राऊत आणि कंपनीतील १०० हून अधिक कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग घेतला. या मोहिमेमध्ये कोपरखैरणे विभागातील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व कर्मचारी यांनी एकत्रितपणे १५० किलोहून अधिक कचरा जमा केला.

# एक कोटी ५९ लाख ३० हजारांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

व्यवसायात गुंतवणूक करून नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि पैसे परत न देता फसवणूक केल्याप्रकरणी तिघां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मेहवाज मतीन हसवारे हे खारघर, सेक्टर ८ येथे राहत असून त्यांना ओळखीचे राहिल इस्माईल सोंडे (रा. नांदगाव, मुरुड) आणि त्याचे मेव्हणे दिवाण मोटर्सचे मालक सलमान अनवर दिवाण आणि सुफियान अनवर दिवाण (रा. पटेल मोहल्ला, पनवेल) यांनी दिवाण मोटर्सच्या व्यवसायात गुंतवणूक करून त्यावर नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले आणि ५६ लाख रुपये रोख घेतले. त्यानंतर सलमान आणि सुफियान यांनी त्यांचे राहते घर पटेल मोहल्ला पनवेलच्या बाजूचे घर खरेदी करून गुंतवणूक करण्यास सांगितली आणि त्यावर नफा मिळवून देतो व दिलेल्या रकमेच्या मोबदल्यात बांधत असलेल्या १० माळ्याच्या टॉवरमध्ये पाच फ्लॅट देतो असे सांगून एक कोटी तीन लाख तीस हजार रुपये घेतले. असे एकूण मेहवाज यांच्याकडून एक कोटी ५९ लाख ३० हजार रुपये घेऊन सदरची रक्कम परत मागितली असता रक्कम न देता अंडरवर्ल्ड मध्ये ओळख असून पैसे परत मागितले तर मारून टाकू अशी दमदाटी केली.

# नेरूळच्या दिल्ली पब्लिक शाळेत वनमंत्र्यांच्या हस्ते वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या नेरुळ-सीवूड्स येथील दिल्ली पब्लिक शाळेला राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांनी मुलांसमवेत शैक्षणिक विषयावर संवाददेखील साधला. त्याचप्रमाणे वनमंत्री नाईक यांनी वृक्षारोपण केले. शालेय विद्यार्थ्यांच्या रायफल शुटींग कक्षालादेखील वनमंत्री नाईक यांनी आवर्जुन भेट देत खेळाडूंचे कौतुक केले.



वनमंत्री नाईक यांनी शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा, वर्गखोल्या, प्रयोगशाळा तसेच एकूणच शाळेच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर माहिती घेतली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दर्जेदार शिक्षण व आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे मत यावेळी वनमंत्री नाईक यांनी व्यक्त केले. शिक्षण क्षेत्रात अशा दर्जेदार उपक्रमांना नेहमीच पाठबळ देणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करून मुलांमध्ये 'झाडे लावा, झाडे जगवा' त्याच प्रमाणे हरित नवी मुंबईचा हा संदेश देखील विद्यार्थ्यांना दिला. शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम पिढी घडवण्याच्या दिशेने डी. पी.एस शाळा कार्य करत आहे याचा आनंद असल्याची प्रतिक्रीया पालिकेच्या शिक्षण उपायुक्त तथा सचिव संघरत्ना खिल्लारे यांनी दिली.

# नवी मुंबई पोलिसांच्या सेवेत 'सजग ॲप'

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी गस्ती पोलिसांवर मोठी जबाबदारी असते. त्यांच्यासाठी सजग ॲप आणि डॅश कॅमेरा देण्याची सुरुवात करण्यात आली आहे.

सध्या हे ॲप प्रायोगिक तत्त्वावर सुरू असून लवकरच पूर्ण क्षमतेने होणार आहे. शुक्रवारी झालेल्या वार्षिक पत्रकार परिषदेत पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी ही माहिती दिली. दरम्यान २०२५ मध्ये गुन्ह्यांची उकल होण्याचे प्रमाण तीन टक्क्यांनी वाढले असल्याचेही त्यांनी सांगितले.

नवी मुंबई पोलिसांनी गस्त पोलीस सेवेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून पोलिसांसाठी सजग ॲप आणि डॅश कॅमेरा दिला जात आहे. या शिवाय प्रायोगिक तत्त्वावर सजग ॲप हे स्मार्ट वाचप्रमाणे काम करणार आहे. गस्त पोलीस पथक ज्या-ज्या ठिकाणी गस्त घालण्यासाठी गेले, त्याची माहिती या ॅपद्वारे मिळते. या शिवाय गस्त घालत असताना कोण कुठे, किती वेळ थांबले याचीही माहिती साठवली जाते. चारचाकी गाड्यांतूनही गस्त घालत असताना त्यांना डॅश कॅमेरा पुरवण्यात येत असून त्याद्वारे ज्या-ज्या ठिकाणी गस्त पथक गेले त्याचे चित्रीकरण करून ते जतन करण्यात येणार आहे.



नवी मुंबई पोलिसांच्या वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांना आतापर्यंत दहा बॉडी वॉर्न कॅमेरे देण्यात आले आहेत. या बॉडी वॉर्न कॅमेऱ्यांची संख्या आणखी वाढवण्यात येणार आहे. बॉडी कॅमेऱ्यामुळे पोलिसांच्या कारवाईमध्ये पारदर्शकता राहणार आहे. सजग ॲपमुळे त्यात अजून सुधारणा होईल अशी आशा आयुक्त मिलिंद भारंबे यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, नवी मुंबई पोलिसांनी आयुक्तालय कार्यालयाच्या आवारात सीसीटीव्ही कमांड सेंटरची स्थापना केली आहे. तळ मजल्यावर हे काम सुरू असून पहिल्या मजल्यावर त्याचे प्रशिक्षण केंद्र आहे.

**अवघी सहा मिनिटे**

एखादी छोटी मोठी घटना घडल्यावर जेव्हा वेगात अगोदर गस्त पोलीस पथक जाते त्यावेळी सजग ॲपचा सर्वाधिक फायदा होणार आहे. सध्या माहिती मिळताच नवी मुंबई पोलीस सुमारे सहा मिनिटांत पोहचतात. हा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा वेगवान वेळ आहे.

दरम्यान, वर्ष २०२४मध्ये ७,३६९ गुन्हे दाखल झाले असून ५,६७८ (७७ टक्के) गुन्ह्यांची उकल झाली तर २०२५मध्ये ७,८३५ गुन्हे दाखल झाले असून ६,२७६ (८० टक्के) गुन्ह्यांची उकल झाली.

**वाहतूक नियमभंगाचे नऊ लाख ८० हजार गुन्हे**

वाहतुकीच्या नियमांचा भंग केल्याप्रकरणी २०२४ मध्ये एकूण ८ लाख ८७ हजार ७७० गुन्हे दाखल करण्यात आले होते. २०२५ मध्ये हे प्रमाण वाढून नऊ लाख ८० हजार ८०६ वर गेले. हेल्मेट न घालणाऱ्या दोन लाख तीन हजार ४३७ दुचाकीस्वारांवर वर्षभरात कारवाई केली आहे.

# चिरनेर येथे गणेशभक्तांची गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्ट चतुर्थी निमित्ताने ५ फेब्रुवारी रोजी गणेशभक्तांनी प्राचीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. या वेळी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी गणेश भक्तांनी आवर्जून हजेरी लावून, मनोभावे दर्शन घेतले. चिरनेर येथील गणपतीच्या मंदिराची निर्मिती पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत झाली. चिरनेर येथील गणपती मंदिर हे हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते.

हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून, या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात. अशी गणेश भक्तांची श्रद्धा आहे. श्रींच्या देवस्थानामुळे चिरनेर परिसरातील नागरिकांना दर महिन्याला योग्य असा रोजगार मिळाला असल्याची माहिती देवस्थानचे माजी विश्वस्त संतोष ठाकूर यांनी सांगितले.



# निसर्ग उद्यानात अजगराचे दर्शन

## सर्पमित्राने केली सुखरूप सुटका

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे सेक्टर चौदा येथील निसर्ग उद्यान या हिरवाईने नटलेल्या परिसरात १५ फुटी अजगर आढळून आला. रस्त्यात वेटोळे घालून बसलेल्या अजगराला पाहण्यासाठी मोठी गर्दी उसळली होती. मात्र अग्निशमन दलाने सर्प मित्राची मदत घेत अजगराला पकडून त्याची सुखरूप सुटका करण्यात आली. त्याची तपासणी करून त्याला महापे येथील जंगलात सोडण्यात आले.



पूर्वीच्या डंपिंग ग्राउंड परिसरावर मियावाकी अंतर्गत लाखो देशी झाडे लावून मानवी जंगल फुलविण्यात आले आहे. या निसर्ग रम्य परिसरात किंग कोब्रा पासून ते कोल्ह्याचे देखील दर्शन झाले आहे. सुरवातीला अजगराने हा रस्ताच अडवला होता. त्याला पाहायला नागरिकांनी गर्दी केली होती, मात्र गोंगाट झाल्यावर जवळच्या झाडाचा आसरा त्याने घेतला. त्याला पाहण्यास प्रचंड गर्दी वाढत होती. जो तो आपल्या मोबाईल कॅमेरात त्याला टिपत होता. सजग नागरिकाने याबाबत कोपरखैरणे अग्निशमन दलाला संपर्क करून ही माहिती दिली. ही माहिती मिळताच कोपरखैराणे अग्निशमन दलाने घटनास्थळी घाव घेतली. सोबत एका सर्प मित्राला घेतले होते. त्याच्या साहाय्याने हा सुमारे १५ फुटी अजगराला पकडण्यात आले. त्याची तपासणी करून त्याला महापे येथील डोंगरी भागात सुखरूप सोडण्यात आले.

# लिटिल आयडल किड्स स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**पनवेल : वार्ताहर**

लिटिल आयडल किड्स स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन पनवेल शहरातील आद्यक्रांतीवर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात साजरे झाले.

या वेळी आमदार विक्रांत पाटील, आवाज महामुंबईचा चॅनेलचे संपादक मिलिंद खारपाटील, उसर्लीचे माजी सरपंच विश्वास भगत, अतुल तांबे, संगीत शिक्षक दीपक कदम, आगरी अभिनेत्री रंजिता पाटील, भगत, हिरामण कोकणे, राहुल गुप्ता, जयप्रकाश गुप्ता आदी उपस्थित होते.

छोट्या छोट्या बच्चे कंपनीने अतिशय सुरेख नृत्य करुन पालक आणि प्रेक्षकांना खुर्चीस खिळून ठेवले होते. प्रत्येक गाण्यानंतर टाळ्या, शिट्या आणि वन्स मोअर असा जोरदार प्रतिसाद मिळत होता. सुहाने रिश्ते या थीम खाली हे स्नेहसंमेलन झाले. राष्ट्रगीत आणि दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. देशभक्तीपर गीते अंगावर रोमांच आणत होती.



कार्यक्रमात पालक आणि शिक्षकांनीदेखील उत्स्फूर्त पणे गाण्यांवर सुरेख नृत्य करुन उपस्थितांची वाहवा मिळवली. स्कूलचे चेअरमन मनोज गुप्ता, प्राचार्या पुनम गुप्ता, शिक्षकवर्ग मृणाल पवार, शीतल भामरा, सुजाता चोरगे, जयीता कर्माकर,श्रद्धा नवघणे, विद्या महाले, धनश्री ढोकरे या सर्व शिक्षकांनी विशेष मेहनत घेतल्याचे दिसून आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवांगी तिवारीने अतिशय उत्कृष्ट केले.

# उरण परिसरात पोपटी पार्ट्यांचे बेत

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण परिसरात मागील आठवड्यापासून शेतात तसेच फार्म हाऊसमध्ये पोपट्या पार्ट्या रंगण्यास सुरुवात झाली आहे. सध्या परजिल्ह्यातून येणाऱ्या पावट्यावर पोपट्या पार्ट्या अवलंबून आहेत. मात्र चिरनेर परिसरात आता कुठे गावठी वाल तयार होण्याची सुरुवात झाली असल्यामुळे पोपटीची लज्जत वाढली आहे. थंडी पडू लागली की खवय्यांना चाहूल लागते. ती पोपटी पार्टीची. हवेत गारवा आल्याने सध्या पोपटी पार्टीचे बेत आखले जाऊ लागले आहेत.

उरण, नवी मुंबई येथील अष्टगंध कला मंचाच्या स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने बुधवारी (दि.४) चिरनेर येथील मानसी फार्म हाऊसवर पोपटी पार्टीचे व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेह मेळाव्याच्या पोपटी पार्टीत कलामंचाने कृतज्ञता म्हणून पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे व पत्रकार कैलासराजे घरत यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. स्नेह मेळाव्यात ज्येष्ठ रंगकर्मी विद्याधर म्हात्रे, धनेश्वर म्हात्रे, हसूराम पाटील, कृष्णकांत म्हात्रे, रमेश कोळी यांनी नाट्य संवादातून अभिनयाचे रंग उधळले.

या वेळी अध्यक्ष अशोक म्हात्रे, निर्माता रमेश कोळी, ज्येष्ठ रंगकर्मी विद्याधर म्हात्रे, नाटककार हसूराम पाटील, दिग्दर्शक धनेश्वर म्हात्रे, पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे, पत्रकार कैलासराजे घरत, रंगकर्मी कृष्णकांत म्हात्रे, गायक जयकिसन मोकल, रमाकांत घरत, अलंकार कडू, समीर म्हात्रे, निखिल पाटील, नयन ठाकूर यांच्यासह अनेक कलाकार उपस्थित होते. सूत्रसंचालन धनेश्वर म्हात्रे यांनी केले.



# नवी मुंबई विमानतळाजवळ उभारणार जागतिक दर्जाची 'इन्होवेशन सिटी'

## टाटा समूह करणार ९० हजार कोटींची गुंतवणूक



**पनवेल : वार्ताहर**

देशाच्या पायाभूत सुविधा आणि तांत्रिक विकासाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल उचलले जात आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरात एक अत्याधुनिक आणि जागतिक दर्जाची 'इन्होवेशन सिटी' विकसित करण्याच्या योजनेला वेग आला आहे. या प्रकल्पात देशातील अग्रगण्य औद्योगिक समूह टाटा ग्रुप सुमारे ११ अब्ज डॉलर (अंदाजे ९० हजार कोटी रुपये) गुंतवणूक करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

भारताच्या शहरी आणि औद्योगिक विकासामध्ये हा प्रकल्प एक नवा अध्याय ठरणार आहे. ही इन्नोवेशन सिटी केवळ एक व्यावसायिक किंवा आयटी झोन नसेल, तर ते एक संपूर्ण 'अर्बन-टेक इकोसिस्टम' असेल. जिथे संशोधन, नवनिर्मिती, उद्योग आणि आधुनिक जीवनशैली यांचा संगम पाहायला मिळेल. तज्ज्ञांच्या मते, हा प्रकल्प केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर संपूर्ण भारताची आर्थिक आणि औद्योगिक प्रतिमा बदलण्याची क्षमता ठेवतो.

जागतिक दर्जाचे मॉडेल: सिंगापूर, दुबई, लंडन आणि मस्टरडॅम सारख्या शहरांच्या धर्तीवर विमानतळाभोवती हा विकास केला जाणार आहे. कनेक्टिव्हिटी: आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यामुळे जागतिक कंपन्या, गुंतवणूकदार आणि तांत्रिक तज्ज्ञांना थेट आणि जलद दळणवळणाची सुविधा मिळेल. रोजगार निर्मिती: तंत्रज्ञान आणि स्टार्टअप्सना चालना मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. आर्थिक इंजिन: विमानतळाला केवळ वाहतुकीचे केंद्र न मानता, त्याला आर्थिक उपक्रमांचे मुख्य केंद्र बनवण्याची ही योजना आहे.

टाटा समूहाकडून होणारी ही संभाव्य मोठी गुंतवणूक भारताच्या भविष्यातील तंत्रज्ञान क्षेत्रातील विश्वासाचे प्रतीक मानली जात आहे. यामुळे नवी मुंबई परिसर जागतिक गुंतवणुकीचे प्रमुख केंद्र म्हणून उदयास येईल.

# नेरूळमध्ये रमाई आंबेडकर जयंती



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ जयंती उत्सव महिला संघाच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांची १२८वी जयंती नेरूळ येथील कपिल वस्तु बुद्धविहार, सेक्टर १० मध्ये शनिवारी ७ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरी केली. या वेळी आंबेडकरी चळवळीत मोलाचे योगदान देणाऱ्या धम्म उपासिका कचराबाई आडबले यांचा सन्मान नेरूळ जयंती उत्सव महिला संघाच्या वतीने केला.

प्रारंभी, उपासिका वत्सला खरात, दया झेंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामूहिक पंचशील, त्रिशरण घेण्यात आले. या वेळी डॉ. कोमल श्रीखंडे (तेरणा डेंटल हॉस्पीटल) यांनी उपस्थित महिला उपासिका यांच्या दातांची तपासणी करून दातांची निगा कशी राखावी याबद्दल मार्गदर्शन केले.

या वेळी उपासिका दया झेंडे यांनी माता रमाबाई आंबेडकर यांच्या त्यागमय जीवनकार्यावर प्रकाश टाकत, त्यांच्या संघर्ष, सहनशीलता व सामाजिक जाणीवेचा आदर्श आजच्या पिढीने आत्मसात करण्याचे आवाहन केले. माता रमाई यांनी बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनात दिलेल्या भक्कम साथीतूनच सामाजिक परिवर्तनाची चळवळ बळकट झाल्याचे दया झेंडे यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वत्सला खरात, दया झेंडे, मनिषा सरोदे, संगीता चौधरी, कल्पना कांबळे, अश्विनी खैरे, विद्या अंभोरे, इंदू चंदनशिवे आदी महिला उपासिका यांनी मेहनत घेतली. त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जीवनावर मुलांनी गाणी गायली. स्नेहभोजन होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# आज जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी मतमोजणी

**रोहे : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद गटाचे ४ जागेसाठी व पंचायत समिती गणाच्या ८ जागेसाठी ७ फेब्रुवारी रोजी मतदान झाले होते त्या मतदानाचे सोमवारी (दि.९) मतमोजणी आहे. निवडणूक निर्णय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवल यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रशासन मतमोजणीसाठी सज्ज झाले आहे.

रोहा तालुक्यात जिल्हापरीषदे गटच्या ४ जागेसाठी १४ उमेदवार रिंगणात आहेत.तर पंचायत समिती गणाच्या ८ जागेसाठी २५ उमेदवार रिंगणात आहेत.

रोहा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी मतदार स्त्री ६४९४६, पुरुष ६३८१७ असे एकुण १२८७६३ एवढी मतदार आहेत. शनिवारी झालेल्या मतदानामध्ये स्त्री ४५४६७, पुरुष ४२३०१ एकुण ८७७६८ लोकांनी मतदान केले असून एकूण रोहा तालुक्यात ६८.१६ टक्के मतदान झाले होते.

ही निवडणूक मतमोजणी ज्येष्ठ नागरिक सभागृह या ठिकाणी होणार आहे. मतमोजणी दहा वाजता सुरू



## रोह्यात निवडणूक प्रशासन सज्ज

होणार असून एकूण १५ टेबल मतमोजणीसाठी असणार आहेत. या ठिकाणी १ सुपरवायझर, १ अधिकारी व १ शिपाई तैनात असणार आहेत.

रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी केंद्राजवळ चोख बंदोबस्त पोलिसांचा असणार आहे.

रोहा तालुका हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला आहे. या बालेकिल्ले शिवसेना (शिंदे गट) ने आव्हान दिले होते याचबरोबर काही जागांवर शिवसेना (उबाठा) शेतकरी कामगार पक्ष,भाजप यासह अपक्ष निवडणूक लढवत आहेत. या निवडणुकीत विविध पक्षाचे दिग्गज नेते व त्यांच्या घरातील उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असल्याने आज त्यांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे.

रोहा तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उभे असलेल्या उमेदवारांमध्ये नागोठणे जिल्हा परिषद गट सुमीत दत्तात्रेय काते (शिवसेना शिंदे गट),किशोर ओटरमल जैन राष्ट्रवादी (अजित पवार गट), साईनाथ दिगंबर धुळे (मनसे),आंबेवाडी जिल्हा परिषद गट निधी नरेंद्र जाधव राष्ट्रवादी (अजित पवार गट), सीमा समिर महाबळे शिवसेना (शिंदे गट), भुवनेश्वर जिल्हा परिषद गट, मधुकर मारुती पाटील राष्ट्रवादी (अजित पवार गट),संदेश सखाराम मोरे शिवसेना ( शिंदे गट ),नितीन दत्तात्रेय वारंगे शिवसेना (उबाठा),दिप चंद्रकांत वायडेकर अपक्ष,घोसाळे जिल्हा परिषद गट सुश्रुता सुभाष पाटील भाजप,संचिता सचिन फुलारे शिवसेना (उबाठा),उर्वशी उदेश वाडकर शिवसेना (शिंदे गट),रोहीणी रामचंद्र सकपाळ राष्ट्रवादी (अजित पवार गट),वैष्णवी हेमंत ठाकुर शेकाप, नागोठणे पंचायत समिती गण समृध्दी संतोष कोळी राष्ट्रवादी (अजित पवार गट), अंजली हिराजी दुर्गावले शिवसेना (उबाठा), सुकेळी पंचायत समिती गण योगीता विलास शिद भाजप, अरुणा जानु हंभीर शिवसेना (उबाठा), गुलाब धर्मा वाघमारे शेकाप, कोलाड पंचायत समिती गण जगन्नाथ गजानन धनावडे राष्ट्रवादी (अजित पवार गट),शोभा मंगेश सरफळे शिवसेना (शिंदे गट), आंबेवाडी पंचायत समिती गण सुरेश शांताराम महाबळे शिवसेना (शिंदे गट), संजय संभाजी मांडलुस्कर राष्ट्रवादी (अजित पवार गट), धाटाव पंचायत समिती गण विजया विनोद पाशिलकर राष्ट्रवादी (अजित पवार गट), स्वप्नाली सचिन मोरे शिवसेना (शिंदे गट), सुप्रिया नितीन वारंगे शिवसेना (उबाठा), भुवनेश्वर पंचायत समिती गण संतोष सोनु खेरटकर शिवसेना (शिंदे गट), सुरेश धोंडु मगर राष्ट्रवादी (अजित पवार गट), न्हावे पंचायत समिती गण वर्षा हेमंत देशमुख शिवसेना (शिंदे गट), सिद्दीका समिर धसाडे भाजप, शिवाणी परेश म्हात्रे राष्ट्रवादी (अजित पवार गट), रुपाली गणेश मढवी शेकाप, ऋषाली तानाजी म्हात्रे अपक्ष,घोसाळे पंचायत समिती गण, मनोहर विठ्ठल गोरे शिवसेना (शिंदे गट), प्रकाश लक्ष्मण धुमाळ भाजप, सचिन अनंत फुलारे शिवसेना (उबाठा) किसन गणपत मोरे राष्ट्रवादी (अजित पवार गट), शंकर सिताराम दिवकर शेकाप, गणेश बाळाराम भगत अपक्ष हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

# अलिबाग जिल्हा न्यायालयात ई-सेवा केंद्राचे उद्घाटन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा न्यायालय रायगड, अलिबाग येथे नागरिकांना व वकिलांना सुलभ, जलद व पारदर्शक सेवा मिळाव्यात या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या ई-सेवा व नक्कल कॉपी कार्यालयाचे उद्घाटन प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजेंद्र सावंत यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या वेळी सृष्टी नीलकंठ, जिल्हा न्यायाधीश-१, एस.आर. तिवारी, जिल्हा न्यायाधीश-२, तसेच एच. डी. भगत, जिल्हा न्यायाधीश-३, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तेजस्विनी निराळे उपस्थित होते. याशिवाय जिल्हा न्यायालयातील सर्व न्यायाधीश, न्यायिक अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

तसेच या कार्यक्रमाला वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, उपाध्यक्ष ॲड.ए.डी. पाटील,सचिव ॲड.अमित देशमुख यांच्यासह अनेक वकील, न्यायालय व्यवस्थापक महेश दायमा उपस्थित होते.

ई-सेवा व नक्कल कॉपी केंद्राच्या माध्यमातून आता न्यायालयीन कागदपत्रांच्या नक्कल प्रती, अर्ज, विविध सेवा अधिक वेगाने व सुलभ पद्धतीने मिळणार असून नागरिकांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होणार आहे. डिजिटल प्रणालीमुळे कामकाजात पारदर्शकता येऊन न्यायप्रणाली अधिक सक्षम होईल असे मत जिल्हाप्रमुख न्यायाधीश राजेंद्र सावंत यांनी व्यक्त केले.



# पोलादपूर तालुक्यातील बहिस्थ मतदारांचे कोणासाठी मतदान हे आज कळणार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील उमेदवारांचे खर्चाचे कोटयवधींचे आकडे आणि विजयाचे दावे हे मतदानाची अंतिम टक्केवारी पाहता संभ्रमात टाकणारे असून बहिस्थ मतदारराजाने कोणासाठी मतदान केले आणि स्थानिक मतदारांना कोण प्रिय, हे आज मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे.

पोलादपूर तालुक्यातील ६७ मतदान केंद्रांमध्ये शनिवारी ३९ हजार २४२ पैकी २४ हजार ७८० मतदान झाले आहे. हे केवळ ६३.१५ टक्के मतदान झाले. कापडे बुद्रुक जि.प. गटातील ११५ माटवण पं.स.गटामध्ये ९९५७ पैकी ५५७८ मतदान झाले, याची टक्केवारी ५५.५८ आहे. माटवण गणात शेकापक्षाच्या साक्षी कांबळेकर विरूध्द राकाँशपच्या हर्षदा वरवाटकर यांच्यात थेट लढत आहे. ११६ माटवण पं.स.गटामध्ये कापडे बुद्रुक पं.स.गणात अनिल दळवी विरूध्द अनिल मालुसरे या थेट लढतीसाठी १० हजार ४९० मतदारांपैकी ६५१५ मतदान झाले. हे केवळ ६२.११ टक्के आहे. कापडे बुद्रुक ५८ जि.प.गटांतर्गत अजय सलागरे



विरूध्द निलेश कुंभार या दोन उच्चशिक्षित अभियंता असलेल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांसाठी एकूण मतदान २० हजार ४४७ पैकी १२ हजार ८४ मतदारांनी मतदान केले. या उच्चशिक्षित उमेदवारांनी मतदानानंतर सर्व कार्यकर्त्यांसोबत चहापान करून तालुक्याला नवा आदर्श घालून दिला आहे.

पोलादपूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेचा सर्वात शेवटचा गट ५९ लोहारे जि.प. अंतर्गत ११७ लोहारे पं.स.गणामध्ये शिवसेनेच्या अनिता भिलारे विरूध्द राष्ट्रवादी काँग्रेसच्या युगज्ञा उतेकर यांच्या लढतीत ८३२६ मतदानापैकी ५७६१ मतदारांनी मतदान केले. हे ६९.१९ टक्के मतदान असून या मतदानामुळे या जि.प.गटामध्ये कोण विजयी होणार हे चित्र स्पष्ट झाले आहे. ११८ कोतवाल बुद्रुक गणातील अविनाश शिंदे (शिवसेना) विरूध्द सुरेंद्र चव्हाण (भाजप) या लढतींसाठी १०४६९ मतदानापैकी ६९३० मतदारांनी मतदान केले. ही टक्केवारी ६६.२० टक्के आहे. याठिकाणी भाजपच्या उमेदवारांना ताकद देणारे मतदान होणार असले तरी मोजक्याच मतदान केंद्रात हे मताधिक्य दिसून येणार आहे. लोहारे ५९ जि.प.गटात १८ हजार ७९५ एकूण मतदान असून कृष्णा कदम (भाजप) विरूध्द चंद्रकांत कळंबे (शिवसेना) तर काँग्रेसचे अ.रझाक करबेलकर आणि अपक्ष कृष्णा चंद्रकांत कदम या चौरंगी लढतीत १२ हजार ६९१ मतदारांनी मतदान केले. या लढतीत भाजपचे उमेदवार कोतवाल बुद्रुक पं.स.गणामध्ये मताधिक्य मिळवतील तर शिवसेनेचे उमेदवार लोहारे पं.स. गणामध्ये मताधिक्य मिळवतील हे स्पष्ट असल्याने कोतवाल बुद्रुक गणामध्ये 'कॉस व्होटींग'ची शक्यता मोठया प्रमाणात दिसून आल्यास लोहारेतील मताधिक्याचा निर्णायक उपयोग विजयास उपयुक्त ठरणार आहे. यादरम्यान, कृष्णा चंद्रकांत कदम आणि काँग्रेसचे अ.रझाक करबेलकर यांच्या मतांमुळे भाजपला मोठया प्रमाणात तोटा होणार असल्याचे नामनिर्देशन पत्र दाखल करतानाचे अनुमान आहे.

भारतीय जनता पक्षाचे आ.प्रवीणभाऊ दरेकर यांनी लोहारे जि.प.गटामध्ये लावलेली ताकद तर मंत्री भरतशेठ गोगावले यांनी मागाठणेचे आ.प्रकाश सुर्वे यांच्यामार्फत टीका करून तसेच शेकापक्षाची मदत घेऊन चारही पंचायत समिती गणांतील मतदारांचे संभाव्य डॅमेज कंट्रोल केल्याने पोलादपूर तालुक्याचे राजकारण ढवळून निघाले असले तरी तालुक्याबाहेरच्या ७० टक्के मतदारांपैकी १८ ते २४ टक्के मतदारांनीच गावाकडे येऊन मतदान केल्यामुळे यावेळी मतदानाचा टक्का घसरलेला दिसून आला. महापालिका क्षेत्रातील मतदारांचे शाई लावलेले बोट अद्याप रंगलेलेच असल्याने अनेक बहिस्थ मतदारांनी पोलादपूर तालुक्यात येण्याचे तसेच येऊनही मतदानाला जाण्याचे टाळले असल्याचे दिसून आले. यामुळे निवडणुक जिंकण्यासंदर्भात करण्यात आलेल्या दाव्यांतील हवा निघून गेल्याचे स्पष्ट झाले आहे.

# खोपोलीत माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान व प्रबोधनात्मक गीतांचा कार्यक्रम



**खोपोली : प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा, युवा पँथर ग्रुप खोपोली व रमाई फाउंडेशन खोपोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित त्यागमूर्ती माता रमाई यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त भव्य व्याख्यान व प्रबोधनात्मक गीतांचा कार्यक्रम शनिवारी संध्याकाळी अत्यंत यशस्वी व उत्साहात पार पडला. या कार्यक्रमातून समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला. मान्यवर वक्ते व सुप्रसिद्ध गायिका आयु. रेश्मा सोनावणे यांच्या प्रभावी व भावस्पर्शी सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमास नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांच्या सह नगरसेवक ,नगरसेविका व राजकीय पक्ष प्रतिनिधी उपस्थित होते. नागरिकांचा मोठ्या संख्येने उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या प्रमाणात उपस्थिती असल्याने कार्यक्रमाची शोभा वाढली. या प्रेरणादायी उपक्रमासाठी आयोजकांचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

# पेण तालुक्यात ७५ टक्के मतदान

**पेण : प्रतिनिधी**

राज्यभरात शनिवारी पडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पेण तालुक्यातही मतदान उत्साहात पार पडले. सायंकाळपर्यंत तालुक्यात सरासरी सुमारे ७० ते ७५ टक्के मतदान झाल्याचा अंदाज प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.

तालुक्यात जिल्हा परिषदेच्या पाच गटांमध्ये आणि पंचायत समितीच्या दहा गणांमध्ये मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. सकाळी सात वाजल्यापासून मतदानास सुरुवात होताच अनेक मतदान केंद्रांवर मतदारांची रांग दिसून आली.

दुपारच्या सुमारास मतदानाचा वेग




काहीसा मंदावला; मात्र सायंकाळी पुन्हा मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान केंद्रांकडे धाव घेतल्याचे चित्र पाहायला मिळाले. यावेळी आमदार रवीशेठ पाटील यांनी रावे येथील जिल्हा परिषद शाळेत मतदानाचा हक्क बजावला. तसेच जिते गटातील अनुसूचित

जमाती प्रवर्गातील भाजप उमेदवार ताई जोमा दरवडा यांनीही मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवला. तसेच वढाव परिसरात एका ८० वर्षीय ज्येष्ठ महिलेला कार्यकर्त्यांनी मतदान केंद्रावर आणून मतदान करण्यास मदत केली.

दादर, जिते, वडखळ, महालमिऱ्या डोंगर आणि शिहू या जिल्हा परिषद गटांमध्ये तसेच सर्व पंचायत समिती गणांमध्ये ग्रामीण भागातील मतदारांनी उत्साहाने मतदान केल्याचे दिसून आले. एकूणच पेण तालुक्यात मतदान शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्याचे प्रशासनाने सांगितले.

# हशाची पट्टीसारख्या दुर्गम भागात मतदानासाठी निवडणुक यंत्रणेचे जीवाची बाजी लावून काम

**चौक : प्रतिनिधी**

मतदारांचा मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्याचे कार्य निवडणूक आयोग व सरकार करीत आहे, अतिशय उंच, खोल आणि दुर्गम भागातील मतदारांपर्यंत नेता, पुढारी पोहचत नाहीत, पण शासकीय यंत्रणा नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्यासाठी जीवाची बाजी लावताना दिसत आहे.खोल दरीतून वाट काढत डोंगर-दऱ्या पार करत, उंच चढण चढताना होणारी दमछाख याची पर्वा न करता शासकीय यंत्रणा तिथपर्यंत पोहोचली आहे.

रायगड जिल्हा परिषद व खालापूर पंचायत समिती खालापूर यांच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी मतदान सुरळीत पार पडले.खालापूर तालुक्यातील हशाची पट्टी येथेही मतदान प्रक्रिया पार पडली. खालापूर तालुक्यात शांततेत व सुरळीतपणे मतदान प्रक्रिया पार पडली. प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे कोणताही अनुचित प्रकार न घडता सर्व मतदान केंद्रांवर मतदान निर्विघ्न पार पडल्याचे चित्र पोलीस यंत्रणा यांच्या मुळे पाहायला मिळाले.



पण खालापूर तालुक्यातील हशाची पट्टी कुठे आहे,? याबाबत चौकशी केली तर अनेकजण कुठे आहे? असा उलट प्रश्न उपस्थित करतील.

हशाची पट्टी हे गाव जग प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण माथेरान जवळ समांतर असून अतिशय दुर्गम भागात आहे. तालुक्यातील अतिदुर्गम भागात त्याची नोंद होते.हशाची पट्टी ही खालापूर तालुक्यात आहे.येथे जाण्यासाठी खालापूर तालुक्यातून मार्ग नाही तर, शेजारील कर्जत तालुक्यात जाऊन जग प्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण माथेरान येथे यावे लागते, माथेरान च्या एका टोकाला पोहचल्यावर दुर्गम भागातील खोल दरी उतरून खालापूर तालुक्यातील हद्दीत हशाची पट्टी येथे यावे लागते.हे मतदान केंद्र विशेष लक्षवेधी ठरत आहे. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केल्या नंतर देखील आज दळणवळण साधन नाही, डिजिटल भारतातील मतदान केंद्रावर इंटरनेट सेवेचा नेहमीच खेळखंडोबा आहे. अशा ठिकाणी मतदान साहित्य व आपले वस्तीचे साहित्य पाठीवर, डोक्यावर घेऊन अधिकारी ते कर्मचारी आपली सेवा बजावत आहेत, या मतदान केंद्रावर जाणाऱ्या सर्वांचे कौतुक आणि अभिनंदन केलेच पाहिजे, अनेक कर्मचारी निवडणूक कर्तव्य नको म्हणून राजकीय दबाव आणताना दिसतात. या दुर्गम भागात एकूण मतदार २२६ आहेत. मतदान किती होते? हा भाग वेगळाच आहे.भारताची लोकशाही आणि निवडणूक प्रक्रिया शेवटच्या मतदारापर्यंत पोहचते एवढे नक्की. मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मतदानाकरिता नियुक्त पथकाने सलग दोन अडीच तास पायी चालत डोंगर,दऱ्या खोऱ्यातून,अडखळ वाटांमधून पायी प्रवास करीत हशाची पट्टी येथे जाऊन लोकशाहीचा उत्सव आणि जागर केला.त्यामुळे लोकशाहीतील,मतदारांच्या हक्काची मतदान प्रक्रिया पूर्णपणे यशस्वीरीत्या पार केली.

क्षेत्रीय अधिकारी अक्षय अरविंद केंजळे,मतदान केंद्राध्यक्ष प्रशांत शिवाजी वाघमारे,मतदान अधिकारी गव्हाणे दत्तात्रय भाऊसाहेब,खरात धाऊ विठ्ठल,परशुराम बाळू सांबरी,शिपाई अनिकेत दत्तू जाधव, अतिश दामोदर गायकवाड,पोलिस कर्मचारी कार्तिक सांगळे, अंकुश उत्तमराव पोले, बूथ लेवल अधिकारी अशोक पांडुरंग येवले यांचा समावेश होता. दुर्गम भौगोलिक परिस्थिती, निसरड्या वाटा व चढ-उतारांचा सामना करीत या पथकाने आपली जबाबदारी पार पाडली. सर्वत्र या कार्याचे कौतुक होत आहे.

# परीक्षेला जाता जाता... मन करे सो प्राण दे, मन करे सो प्राण ले

माणसाचं आयुष्य बाहेरून जितकं परिस्थितींनी चालतं असं वाटतं, तितकंच ते आतून मनाने घडत असतं. कारण मन करे सो प्राण दे, मन करे सो प्राण ले-मन ठरवलं तर माणूस जगतो, आणि मन हार मानलं तर तो श्वास घेत असूनही आतून तुटतो.

जगात प्रत्येक माणसाच्या वाट्याला अडचणी येतात. परीक्षा, स्पर्धा, आर्थिक मर्यादा, अपयश, नकार, टीका-या सगळ्या गोष्टी टाळता येत नाहीत. फरक इतकाच असतो की काही लोक या अडचणींना भिंत मानतात, तर काही त्याच अडचणींना पायरी बनवतात. हा फरक निर्माण करतो तो मनाचा खंबीरपणा. एक लहानसं उदाहरण पाहूया. दोन विद्यार्थी एकाच परीक्षेत नापास होतात. एक विद्यार्थी स्वतःला अपयशी ठरवतो-माझ्यात काहीच नाही असं मानतो आणि पुढचा प्रयत्नच सोडून देतो. दुसरा विद्यार्थी मात्र म्हणतो-ही परीक्षा मी हरलोय, पण आयुष्य नाही. तो पुन्हा उठतो, चुका समजून घेतो आणि अधिक तयारीने पुढे जातो. दोघांची परिस्थिती सारखी असते, पण मनाची भूमिका वेगळी असते-आणि त्यामुळेच भविष्यही वेगळं घडतं.

मन खंबीर असणं म्हणजे कधीही दुःख न येणं नव्हे. दुःख येऊनही त्यात अडकून न राहणं. रडावंसं वाटलं तरी उभं राहण्याचं धैर्य ठेवणं, अपयश आलं तरी स्वतःवरचा विश्वास न गमावणं, आणि परिस्थिती कठीण



असली तरी प्रयत्न सोडू नयेत-हेच खंबीर मनाचं खरं लक्षण आहे.

इतिहासात आणि आजूबाजूला अशी अनेक उदाहरणं आहेत. अनेक यशस्वी लोकांच्या आयुष्यात अपयशांची यादी मोठी असते, पण त्यांनी मन हार मानलं नाही. कारण त्यांना एक गोष्ट कळलेली असते परिस्थिती तात्पुरती असते, पण धैर्य कायमचं असतं.

आजच्या विद्यार्थ्यांसाठी हा मनाचा खंबीरपणा फार महत्त्वाचा आहे. सतत तुलना, अपेक्षांचा दबाव, यशस्वी व्हायलाच हवं ही भीती-या सगळ्यात मन थकून जातं. पण लक्षात ठेवा, प्रत्येकाची वाट वेगळी असते, वेळ वेगळी असते आणि यशाची व्याख्याही वेगळी असते. स्वतःशी प्रामाणिक राहणं आणि सातत्य ठेवणं हेच खरी यशाची गुरुकिल्ली आहे.विश्वास हा बाहेरून येत नाही; तो स्वतःवर निर्माण करावा लागतो. आज केलेला छोटासा प्रयत्न उद्या मोठा परिणाम घडवतो. सातत्य म्हणजे दररोज जिंकणं नव्हे, तर दररोज न थांबणं. जिथे सातत्य असतं, तिथेच यश आपोआप वाट काढतं.

आणि या ध्येयपूर्तीच्या प्रवासात तुम्ही एकटे नाहीत. तुमच्या पाठीशी उभं राहणारं एक संपूर्ण मनांचं बळ आहे-मार्गदर्शन करणारे शिक्षक, विश्वास ठेवणारे पालक आणि तुमच्या उज्ज्वल यशाची वाट पाहणारी माणसं. आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, कारण आम्हाला तुमच्यावर विश्वास आहे.

म्हणूनच,मनाला मजबूत करा, विचारांना सकारात्मक ठेवा,स्वतःवर आणि तुमच्या प्रयत्नांवर विश्वास ठेवा,अपयश आलं तरी थांबू नका-कारण मन करे सो प्राणतेआणि धैर्यशील मन असलं की यश स्वतःच तुमच्याकडे चालत येतं.

**-सुनील गवळी, गटशिक्षणाधिकारी, तथा समुपदेशक**

# भारताचा यूएसएसवर ऐतिहासिक विजय

## आठ सामने जिंकण्याचा वर्ल्ड रेकॉर्डही केला नावावर

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाने आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेत आपल्या मोहिमेची विजयाने सुरुवात केली. भारताने ७ फेब्रुवारीला यूएसएवर मुंबईतील वानखेडे स्टेडियममध्ये २९ धावांनी मात केली. भारताला या सामन्यात फलंदाजी आणि गोलंदाजी दरम्यान संघर्ष करावा लागला. यूएसएने चांगली झुंज दिली, मात्र टीम इंडियाने आपण गतविजेता आणि टी २०i रँकिंगमधील नंबर १ का आहोत हे दाखवून दिलं.



भारताने १६२ धावांचा पाठलाग करणाऱ्या यूएसएला १३२ रन्सवर रोखलं. भारताचा हा यूएसए विरुद्धचा सलग आणि एकूण दुसरा विजय ठरला. तसेच टीम इंडियाने या मोहिमेतील पहिल्याच विजयासह इतिहास घडवला. टीम इंडियाने वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक केला.

टीम इंडियाने यूएसए संघाला पराभूत करुन ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेला झटका दिला. टीम इंडियाने या दोन्ही संघांचा वर्ल्ड रेकॉर्ड ब्रेक केला. इंडिया टी २०i वर्ल्ड कप स्पर्धेत सर्वाधिक सलग सामने जिंकणारी पहिली टीम ठरली. यूएसए विरुद्धच्या सामन्याआधी टी २०i वर्ल्ड कप स्पर्धेत सलग सर्वाधिक ८ सामने जिंकण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड हा संयुक्तरित्या भारत, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाच्या नावावर होता. मात्र वानखेडेत विजय मिळवताचा भारताने इतिहास घडवला.

टीम इंडियाने रोहित शर्मा याच्या नेतृत्वात २००७ नंतर पहिल्यांदाच टी २०I वर्ल्ड कप ट्रॉफीवर नाव कोरलं होतं. सूर्यकुमार यादव याने घेतलेल्या ऐतिहासिक कॅचच्या जोरावर भारताने अंतिम सामन्यात कमालीचं कमबॅक करत दक्षिण आफ्रिकेला पराभूत केलं होतं. भारताचा तो टी २०I वर्ल्ड कप स्पर्धेतील सलग आठवा विजय ठरला होता. भारताने यासह सलग ८ सामने जिंकणाऱ्या दक्षिण आफ्रिकेची विजयाची मालिका खंडीत केली. तसेच भारत त्या वर्ल्ड कप स्पर्धेत अजिंक्य होती. भारताने त्यानंतर आता तीच कामगिरी यूएसए विरुद्ध सुरु ठेवत वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला. दरम्यान टीम इंडिया या मोहिमेतील आपला दुसरा सामना हा १२ फेब्रुवारीला खेळणार आहे. टीम इंडियासमोर या सामन्यात नामिबियाचं आव्हान असणार आहे. हा सामना नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये होणार आहे.

# शिवम सत्रेला राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेत सुवर्णपदक

**कळंबोली : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य युवा व क्रीडा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी रायगडतर्फे लक्ष्मी पब्लिक स्कूल सुकापूर येथे नुकतेच राज्यस्तरीय युनिफाईट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातून स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धकांतून कळंबोली येथील सुधागड संकुलातील शिवम लालसो सत्रे या विद्यार्थ्याने सुवर्णपदक व सहभाग प्रमाणपत्र असे पारितोषिक पटकावले आहे. राष्ट्रीय स्पर्धेसाठी या खेळाडूची निवड झालेली आहे.

या यशाबद्दल सुधागड विद्यासंकुल कळंबोलीचे प्राचार्य राजेंद्र पालवे, उपप्राचार्य संजय पाटील, क्रीडा शिक्षक रणधीर पाटील, पीयूष सदावर्ते यांच्या हस्ते आणि विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शिवम सत्रे या नैपुण्यप्राप्त खेळाडूचा सत्कार करण्यात आला. त्याला राष्ट्रीय स्पर्धेत घवघवीत यश लाभावे अशा सदिच्छा देण्यात आल्यात. शिवम सत्रे या विद्यार्थ्याचे सर्वत्र कौतुक होत असून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.





# भारत-पाक 'क्रिकेट' वादात बांगलादेशची एन्ट्री

**लाहोर : वृत्तसंस्था**

२०२६ च्या टी-२० विश्वचषकातील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यावरून निर्माण झालेला पेच आता आणखी गडद झाला आहे. पाकिस्तानने १५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भारताविरुद्धच्या सामन्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याने स्पर्धेला नाट्यमय वळण मिळाले असतानाच, आता बांगलादेशने या वादात उडी घेतल्याने प्रकरणाला नवी धार आली आहे.

या वादाची ठिणगी बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या (BCB) भूमिकेमुळे पडली. बांगलादेशच्या अंतरिम सरकारने सुरक्षा कारणांचा हवाला देत आपल्या संघाला भारतामध्ये खेळण्यास पाठवण्यास नकार दिला होता. बांगलादेशने आपले सामने सह-यजमान श्रीलंकेत हलवण्याची विनंती 'आयसीसी'ला (ICC) केली होती. मात्र, स्वतंत्र सुरक्षा यंत्रणांच्या अहवालात कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट झाल्याने आयसीसीने ही विनंती फेटाळून लावली. सहभागाची अंतिम मुदत उलटून गेल्याने आयसीसीने





बांगलादेशला स्पर्धेतून बाहेर काढून त्यांच्या जागी 'ग्रुप सी'मध्ये स्कॉटलंडचा समावेश केला.

बांगलादेशच्या हकालपट्टीनंतर पाकिस्तान सरकारने आणि पीसीबीने बांगलादेशची पाठराखण केली. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी राष्ट्रीय संघाला १५ फेब्रुवारी रोजी कोलंबो येथे होणाऱ्या भारताविरुद्धच्या 'हाय-व्होल्टेज' सामन्यावर बहिष्कार टाकण्याचे निर्देश दिले आहेत. पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नकवी यांनी बांगलादेशवरील कारवाईला 'अन्यायकारक' आणि 'राजकीय प्रेरित' म्हटले आहे. कोणत्याही बोर्डाला असुरक्षित वाटणाऱ्या ठिकाणी खेळण्यासाठी भाग पाडले जाऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

### आयसीसीचा कडक इशारा

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद(आयसीसी) ने पाकिस्तानला या बहिष्कारामुळे होणाऱ्या परिणामांची जाणीव करून दिली आहे. जर पाकिस्तानने सामना खेळण्यास नकार दिला, तर त्यांच्यावर मोठी आर्थिक दंडात्मक कारवाई, गुण गमावणे, सदस्यत्व रद्द करणे किंवा भविष्यातील जागतिक स्पर्धांच्या यजमानपदावर गदा येणे, अशा स्वरूपाचे निर्बंध लादले जाऊ शकतात.दरम्यान, 'फोर्स मॅजेअर' (Force Majeure) कलमाचा वापर करून पाकिस्तान या सामन्यातून माघार घेण्याचा प्रयत्न करत आहे, ज्यावर आयसीसीने स्पष्टीकरण मागितले आहे.

# टी-२० वर्ल्डकपमध्ये विंडीजची स्कॉटलंडवर मात

## शेफर्डची हॅट्ट्रिक अन् हेटमायरची तुफान फटकेबाजी

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील दुसरा सामना वेस्ट इंडिज आणि स्कॉटलंड या दोन्ही संघांमध्ये पार पडला. वेस्ट इंडिजकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना शिमरोन हेटमायरने दमदार अर्धशतकी खेळी केली. या खेळीच्या बळावर वेस्ट इंडिजने पाच गडी बाद १८२ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना स्कॉटलंडच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला, पण वेस्ट इंडिजने हा सामना ३५ धावांनी आपल्या नावावर करून विजयाचे खाते उघडले.




या सामन्यात वेस्ट इंडिजचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात आला. सलामीला आलेल्या ब्रेंडन किंग आणि कर्णधार शे होपने दमदार सुरूवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ५४ धावांची भागीदारी केली. यादरम्यान ब्रेंडनने ३५ धावांचे योगदान दिले, तर होपने १९ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या शिमरोन हेटमायरने फलंदाजीत कमाल केली. त्याने ३६ चेंडूंचा सामना करत दोन चौकार आणि सहा षटकारांच्या साहाय्याने ६४ धावांची खेळी केली, तर रोमन पॉवेलने २४ धावा केल्या. शेवटी शेरफेन रुदरफोर्डने १३ चेंडूत २६ धावा चोपल्या. या दमदार खेळीच्या बळावर वेस्ट इंडिजने २० षटकांअखेर ५ गडी बाद १८२ धावा केल्या होत्या.

स्कॉटलंडला या स्पर्धेतील पहिला विजय मिळवण्यासाठी १८३ धावांचा डोंगर सर करायचा होता. स्कॉटलंडला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. सलामीवीर फलंदाज मायकल जोन्स पाच चेंडूत एक धाव करून माघारी परतला, तर जॉर्ज मुंसीने १५ चेंडूत अवघ्या १९ धावा केल्या. स्कॉटलंडला हवी तशी सुरुवात मिळू शकली नाही. त्यानंतर ब्रेंडन मॅक्मुलेन अवघ्या १४ धावा करून माघारी परतला. कर्णधार रिची बेरिंगटन आणि टॉम ब्रुसने मिळून स्कॉटलंड संघाचा डाव सांभाळला, पण रिची बेरिंगटन ४२ धावा करून माघारी परतला. तर इतर फलंदाजांनाही हवी तशी कामगिरी करता आली नाही. त्यामुळे स्कॉटलंडला हा सामना गमवावा लागला.

# वैभवकडून सामनावीर पुरस्कार सपोर्ट स्टाफला समर्पित




**मुंबई :** कर्णधार आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने फलंदाजीचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशीने सलामीला उतरत ३२ चेंडूत अर्धशतक झळकावले. यानंतर त्याने ५५ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. यासह वैभवने ८० चेंडूत १५ चौकार व १५ षटकारांच्या मदतीने १७५ धावांची उत्कृष्ट खेळी केली.

वैभव सूर्यवंशी सामनावीर ठरला तसेच स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूही ठरला. वैभवने सात सामन्यांमध्ये ४३९ धावा केल्या आहेत. सामनावीर पुरस्कार पटकावल्यानंतर तो म्हणाला, खूप छान वाटतंय. संपूर्ण तयारी, सपोर्ट स्टाफने घेतलेली मेहनत, आम्ही खेळलेले सर्व सामने आशिया कप आणि त्यानंतरची मालिका या सगळ्याने आम्हाला या क्षणापर्यंत आणून पोहचवले आहे. हा पुरस्कार मी संपूर्ण सपोर्ट स्टाफला समर्पित करू इच्छितो.

# आयुष म्हात्रे थेट विराट कोहलीच्या पंक्तीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील १९ वर्षांखालील युवा टीम इंडियाने झिम्बाब्वेच्या मैदानात इतिहास रचला आहे. वैभव सूर्यवंशीच्या धडाकेबाज शतकी खेळीसह कर्णधार आयुष म्हात्रेच्या अर्धशतकासह अन्य फलंदाजांनी केलेल्या तगड्या फलंदाजीच्या जोरावर भारतीय संघाने इंग्लंडविरुद्धची फायनलची लढाई ४०० पार धावांची केली होती.

भारतीय संघाने विक्रमी विजयासह सहाव्यांदा ट्रॉफीवर नाव कोरत या स्पर्धेतील जेतेपदाचा विश्वविक्रम आणखी मजबूत केला. या ऐतिहासिक



कामगिरीसह आयुष म्हात्रे थेट विराट कोहलीच्या पंक्तीत जाऊन बसला आहे.

भारतीय संघाचा माजी खेळाडू मोहम्मद कैफ याने १९९९मध्ये भारतीय संघाला अंडर १९ वर्ल्डकप स्पर्धेची पहिलीवहिली ट्रॉफी जिंकून दिली होती. श्रीलंकेला पराभूत करत भारतीय संघाने ही स्पर्धा गाजवली होती.

रनमशिन आणि किंग कोहली या नावाने क्रिकेट जगतात अधिराज्य गाजवणारा भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीने २००८मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या फायनलमध्ये भारतीय संघाला अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेतील दुसरी ट्रॉफी जिंकून दिली होती.

उन्मुक्त चंद याच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने २०१२मध्ये ऑस्ट्रेलियाला पराभूत करत तिसरे जेतेपद पटकावले होते. अंडर-१९ वर्ल्डकप विजेत्या कर्णधारांच्या यादीत पृथ्वी शॉचाही समावेश आहे. २०१८मध्ये त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने ऑस्ट्रेलियाला शह देत चौथ्यांदा अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धा जिंकली होती.

यश धुलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने २०२२मध्ये इंग्लंडला पराभूत करत पाचव्यांदा अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेचे जेतेपद मिळवले होते. २०२६च्या हंगामात आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने इंग्लंडला पराभूत करत सहाव्यांदा अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धा जिंकली.

# वैभव सूर्यवंशीला वरिष्ठ संघात पदार्पणासाठी करावी लागणार प्रतीक्षा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या अंडर-१९ संघाने इंग्लंडला पराभूत करत सहाव्यांदा ट्रॉफीवर नाव कोरले. १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी या सामन्याचा सामनावीर ठरला. भारताने विश्वचषक जिंकल्यानंतर अजूनही वैभवच्या या खेळीची चर्चा सुरू आहे. वैभवने अंतिम सामन्यात ८० चेंडूत १७५ धावांची वादळी खेळी करत इंग्लंडच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. वैभवच्या या वादळी खेळीनंतर त्याला अजूनही सिनियर संघात संधी मिळालेली नाही, पण बीसीसीआयची इच्छा असली तरी ते त्याला पदार्पणाची संधी देऊ शकणार नाही.

वैभवने १५ षटकार व १५ चौकार, कमालीचा स्ट्राईक रेट आणि फायनलसारख्या मोठ्या सामन्यात दाखवलेली निर्भीड फलंदाजीने वैभव सूर्यवंशीने पुन्हा चाहत्यांची मने जिंकली. वैभव हा अंडर-१९ वर्ल्डकपमधील भारतासाठी सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. वैभवने अंडर-१९ विश्वचषक स्पर्धेत सात




सामन्यांमध्ये ४३९ धावा केल्या. यासह तो विश्वचषक स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूही ठरला.

अंडर-१९ वर्ल्डकप फायनलमध्ये इंग्लंडविरुद्ध वैभव सूर्यवंशीने ८० चेंडूत १७५ धावांची वादळी खेळी केली, मात्र तरीही त्याला सध्या भारताच्या सीनियर संघात खेळता येणार नाही. यामागील सर्वात मोठा अडथळा म्हणजे बीसीसीआयची किमान वयोमर्यादा धोरण. २०२०मध्ये लागू करण्यात आलेल्या या नियमाचा उद्देश तरुण खेळाडूंचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपणे हा आहे.

आयसीसीच्या नियमांनुसार, आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यासाठी खेळाडूचे वय किमान १५ वर्षे असणे बंधनकारक आहे. वैभव सूर्यवंशीचा जन्म २७ मार्च २०११ रोजी झाला आहे. फेब्रुवारी २०२६मध्ये भारताला अंडर-१९ वर्ल्डकप जिंकून देताना तो तांत्रिकदृष्ट्या अजूनही १४ वर्षांचाच आहे. त्याने बिहारकडून कितीही जलद शतके केली, राजस्थान रॉयल्सकडून आयपीएलमध्ये कितीही गोलंदाजांची धुलाई केली तरी २७ मार्च २०२६पर्यंत भारतीय निवड समितीचे हात बांधलेलेच राहणार आहेत.

विशेष म्हणजे, सीनियर संघासाठी तो खूपच लहान असला तरी आता त्याचा अंडर-१९ प्रवासही संपला आहे. बीसीसीआयकडून अंडर-१९ वर्ल्डकपसाठी 'वन-टूर्नामेंट रूल' लागू करण्यात आला आहे. या नियमानुसार एकाच खेळाडूला पुन्हा पुन्हा अंडर-१९ वर्ल्डकप खेळू दिला जाणार नाही. यामागचा उद्देश म्हणजे नव्या प्रतिभावान खेळाडूंना सातत्याने संधी मिळावी हा आहे.

# न्यूझीलंडचा अफगाणिस्तानवर विजय

**चेन्नई : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड संघाने टी-२० विश्वचषक मोहिमेची विजयाने सुरूवात केली आहे. न्यूझीलंडने अफगाणिस्तानचा ५ विकेट्सने पराभव करत सामना आपल्या नावे केला आहे. न्यूझीलंडचा टी-२० वर्ल्डकपमधील ऐतिहासिक विजय ठरला, कारण न्यूझीलंडने आजवर १८२ धावांचं मोठं लक्ष्य विश्वचषकात आजवर कधीच यशस्वीरित्या गाठलं नव्हतं. अफगाणिस्तानने विजयासाठी १८२ धावांचं लक्ष्य दिलं होतं, जे संघाने १७.५ षटकांत गाठलं.




न्यूझीलंड आणि अफगाणिस्तान यांच्यातील टी-२० विश्वचषकातील सामना चेन्नईच्या चेपॉक स्टेडियममध्ये खेळवला गेला. या सामन्यात न्यूझीलंडने बाजी मारली. अफगाणिस्तानने गोलंदाजी-फलंदाजी विभागात चांगली कामगिरी केली, पण संघ विजय मात्र मिळवू शकला नाही. न्यूझीलंडने यासह टी-२० विश्वचषक २०२४ मधील पराभवाचा बदला घेतला आहे. त्या सामन्यात अफगाणिस्तानने न्यूझीलंडला फक्त ७५ धावांवर सर्वबाद केलं होतं. पण आता किवी संघाने २०२६च्या विश्वचषकात विजय मिळवत बदला घेतला.

अफगाणिस्तानने दिलेल्या १८२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सेफर्ट व फिलिप्सने शानदार खेळी केली. मुजीबने दुसऱ्या षटकात फिन एलन व रचिन रवींद्र यांना क्लीन बोल्ड केलं. पण फिलिप्स सेफर्टच्या ७४ धावांच्या भागीदारीने संघाला सामन्यात कायम ठेवलं. सेफर्टने ४२ चेंडूत ७ चौकार व ३ षटकारांसह ६ धावांची खेळी केली. तर ग्लेन फिलिप्स २५ चेंडूत ७ चौकार व एका षटकरासह ४२ धावा करत बाद झाला. तर मार्क चॅपमनने २८ धावांचं योगदान दिलं. तर अखेरीस सँटरन व डॅरिल मिचेल यांनी संघाला विजय मिळवून दिला.

अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. रहमानुल्ला गुरबाज २७ धावा करत संघाला चांगली सुरूवात करून दिली. गुरबाज झाद्रान फर्ग्युसनच्या एका षटकात झेलबाद झाले. यानंतर गुलबदिन नायबने वादळी खेळी केली. गुलबदिनने ३५ चेंडूत ३ चौकार व ४ षटकारांच्या मदतीने ६३ धावा केल्या. तर सदिकउल्ला अटलने २९ धावांचं योगदान दिलं. तर दारविश रसूलीने १३ चेंडूत २० धावा केल्या. तर ओमरझाईने १४ धावा आणि नबीने १० धावांचं योगदान दिलं. यासह अफगाणिस्तानचा संघ २० षटकांत ६ बाद १८२ धावा करण्यात यशस्वी ठरला.

फिरकीसाठी अनुकूल असलेल्या चेपॉकच्या खेळपट्टीवर न्यूझीलंडकडून लॉकी फर्ग्युसनने सर्वाधिक २ विकेट्स घेतल्या.

# नेपाळच्या संघाचे स्वप्न भंगलं

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

शेवटच्या षटकात १० धावा करण्याचं आव्हान नेपाळसमोर होतं. लोकेश बाम विरुद्ध सॅम करन अशा लढाईत अनुभवी सॅम करनने बाजी मारली. अटीतटीच्या लढतीत इंग्लंडने अवघ्या ४ धावांनी विजय मिळवला.

नेपाळने आसिफ शेखला झटपट गमावलं. त्यानंतर कुशल भुर्टेल आणि रोहित पौडेल यांनी वेगवान भागीदारी केली. भुर्टेल १७ चेंडूत २९ धावांची खेळी करून बाद झाला.

नेपाळने नियमित अंतरात विकेट्स घेतल्या. विल जॅक्सने १८ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारासह नाबाद ३९ धावांची खेळी केली. ब्रूकने ३२ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ५३ धावांची खेळी केली. नेपाळतर्फे दिपेंद्र सिंग एरी आणि नंदन यादव यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. १८ चेंडूत ३९ धावांची खेळी करणाऱ्या विल जॅक्सला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com